सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. १४ डिसेंबर २०२५ | वर्ष – ३ रे | अंक २४८ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पुणे-संभाजीनगर प्रवास २ तासात

## केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरींकडून ग्रीन फील्ड सुपर हायवेची घोषणा

**नागपूर :** भाजप नेते आणि केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी मोठी घोषणा केली आहे. त्यांनी पुणे ते संभाजीनगर या दोन शहरांना जोडणारा नवीन महामार्ग बांधला जाणार असल्याची माहिती दिली आहे. हा प्रकल्प १६ हजार ३१८ कोटींचा असून यामुळे पुणे संभाजीनगर हे अंतर अवघ्या दोन तासांवर येणार असल्याची माहितीही गडकरी यांनी दिली आहे. सध्याच्या घडीला पुण्याहून संभाजीनगरला जायला किमान सहा ते साडेसहा तास लागतात. हे अंतर आता जवळपास निम्म्याहून कमी होऊन अवघ्या दोन तासांवर येणार आहे.

या प्रकल्पाविषयी माहिती देताना गडकरी यांनी सांगितलं की, आम्ही पुणे ते संभाजीनगर हा नवीन एक्स्प्रेस हायवे बांधत आहोत. यासाठी १६ हजार ३१८ कोटींचा खर्च येणार आहे. याचा एमएयू झाला असून पहिला रस्ता पुणे, अहिल्यानगर आणि संभाजीनगर असा असणार आहे.



तो रस्ता आधी पूर्णपणे चांगला करणार आहे. यावर काही ठिकाणी पूल बांधले जाणार आहेत. यासाठी दोन हजार कोटी खर्च केले जाणार आहेत.

या व्यतिरिक्त आपल्याला दुसरा रस्ता शिक्रापूर येथून जाणार आहे. हा रस्ता अहिल्यानगरच्या बाहेरून थेट बीड जिल्ह्यात जाईल आणि तिथून तो संभाजीनगरपर्यंत जोडला जाईल. हा ग्रीन फिल्ड हायवे असणार आहे. या हायवेसाठी १६ हजार ३१८ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. यात सगळ्या गोष्टी जवळपास पूर्ण झाल्या आहेत. फक्त तेथील एका टोलचा निर्णय व्हायचा बाकी आहे. यासाठी अजून दोन तीन वर्षांचा कालावधी आहे. तो शिफ्ट करायचा आहे. तो शिफ्ट झाला की या प्रकल्पाचं काम सुरू होईल.

हा रस्ता तयार झाला तर संभाजीनगर ते पुणे अंतर केवळ दोन तासात पार करता येणार आहे. तर संभाजीनगर नागपूर हे अंतर अडीच तासांत पार करता येणार आहे. एकूणच काय तर हा एक्स्प्रेस हायवे पुणे ते नागपूर असा होणार आहे, अशी माहिती नितीन गडकरी यांनी दिली. ते नागपुरात पत्रकारांशी बोलत होते. यावेळी त्यांनी महाराष्ट्रातील इतरही काही आगामी प्रकल्पांची माहिती दिली.

# नियम मोडणाऱ्या शाळांची गय नाही

**नागपूर :** महाराष्ट्रात मराठी भाषेचा सन्मान राखण्यासाठी आणि ती प्रत्येकापर्यंत पोहोचवण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे. राज्यातील शाळांमध्ये मराठी सक्तीचा ऐतिहासिक निर्णय घेतल्यानंतर, आता या निर्णयाला बगल देणाऱ्या शाळांच्या मनमानी कारभाराला चाप लावण्यासाठी सरकारने आक्रमक पवित्रा घेतला आहे.

**मराठीच्या मुद्यावर सरकार 'ॲक्शन मोड'मध्ये**

केंद्रीय मंडळाच्या शाळांनी मराठी विषय 'ऐच्छिक' ठेवल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान होत असल्याची गंभीर दखल घेत, अशा शाळांवर कडक कारवाई करण्याचे स्पष्ट संकेत सरकारने आज विधान परिषदेत दिले.

फेब्रुवारी २०२४ मध्ये सरकारने राज्यातील सर्व माध्यमांच्या आणि मंडळांच्या शाळांना मराठी भाषा शिकवणे अनिवार्य केले होते. हा निर्णय म्हणजे मराठी अस्मितेच्या जपणुकीसाठी टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल होते. मात्र, काही केंद्रीय शाळांनी या आदेशांचे पालन न करता मराठी विषय ऐच्छिक ठेवल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे ८५,४९७ विद्यार्थ्यांना मराठीचे शिक्षण मिळाले नसल्याची बाब समोर येताच, सरकारने यावर तातडीने कठोर भूमिका घेतली आहे.

आज विधान परिषदेत एका लेखी प्रश्नाला उत्तर देताना सरकारने स्पष्ट केले की, राज्यात शाळा कोणत्याही मंडळाची असो, मराठी शिकावीच लागेल. सरकारी आदेश धाब्यावर बसवणाऱ्या शाळांची आता गय केली जाणार नाही.









लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## जन्म-मृत्यू प्रमाणपत्राची मूळ प्रत जमा करण्याचे आवाहन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १३ डिसेंबर :** महाराष्ट्र शासनाने सप्टेंबर २०२३ ते जानेवारी २०२५ या कालावधीत तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी या पदापेक्षा कमी दर्जाच्या अधिकाऱ्याने विलंबीत जन्म-मृत्यूच्या घटनेची नोंद घेण्यासाठीचे दिलेले सर्व आदेश व या आदेशाच्या आधारे दिलेले जन्म-मृत्यू प्रमाणपत्र रद्द केलेले आहेत.

लातूर मनपा क्षेत्रात या कालावधीत एकूण १६७७ विलंबीत जन्म-मृत्यू प्रमाणपत्रे निर्गमीत करण्यात आली होती. या कालावधीत सदरील विलंबीत जन्म-मृत्यू प्रमाणपत्रे रद्द करण्यात आली असल्याचे व सदरील जन्म-मृत्यू प्रमाणपत्र मनपा कार्यालय कींवा तहसील कार्यालय येथे जमा करणे बाबत यापूर्वी वेळोवेळी सूचन देण्यात आल्या आहेत तसेच तहसील कार्यालय, मनपा कार्यालयाचे कर्मचारी यांनी घरोघरी जावून भेटी देवून माहिती दिलेली आहे. तथापि अद्याप बऱ्याच नागरिकांनी त्यांची मुळ जन्म-मृत्यू प्रमाणपत्रे अद्याप जमा केलेली नाहीत. तसेच कांही नागरिकांनी झेरॉक्स प्रत जमा केलेली आहे. शासन निर्णय दि.१६ सप्टेंबर २०२५ नुसार प्रमाणपत्र वापस जमा करण्यासाठी ३ महिन्याची मुदत देण्यात आली होती व सदरील मुदत मंगळवार १६ डिसेंबर २०२५ रोजी संपत आहे. ज्या नागरिकांनी त्यांची रद्द झालेली मूळ जन्म-मृत्यू प्रमाणपत्रे वापस जमा केलेली नाहीत अशा प्रमाणपत्रधारकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे शासनाकडून सुचना प्राप्त झाल्या आहेत.



# लोकसभेचे माजी अध्यक्ष शिवराज पाटील चाकूरकर यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार






**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १३ डिसेंबर :** जवळपास सहा दशके आपल्या सुसंकृत राजकारणाने जनसेवा करणारे लातूर जिल्ह्याचे सुपुत्र शिवराज पाटील चाकूरकर यांच्या पार्थिवावर आज वरवंटी (ता. लातूर) येथे शासकीय इतमामात, मंत्रोच्चारात अंत्यसंस्कार करण्यात आले. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ, राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी यावेळी पुष्पचक्र अर्पण करून शिवराज पाटील चाकूरकर यांना श्रद्धांजली वाहिली. तसेच पोलीस दलाच्या जवानांनी यावेळी बंदुकीच्या फैरींची सलामी देऊन मानवंदना दिली.

तत्पूर्वी सकाळी देवघर निवासस्थानी शिवराज पाटील यांच्या पार्थिवाला पोलीस दलातर्फे मानवंदना दिल्यानंतर अंत्ययात्रेला सुरुवात झाली. फुलांनी सजविलेल्या रथातून त्यांचे पार्थिव औसा रोड, छत्रपती शिवाजी महाराज चौक, पीव्हीआर चौकमार्गे वरवंटी येथे पाटील चाकूरकर कुटुंबियांच्या शेतामध्ये आणण्यात आले. याठिकाणी शोकाकुल जनसमुदायाच्या उपस्थितीत शिवराज पाटील चाकूरकर यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी उपस्थित विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शिवराज पाटील चाकूरकर यांचे पुत्र शैलेश पाटील चाकूरकर, स्नुषा डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्यासह कुटुंबियांचे सांत्वन केले.

कर्नाटक राज्याचे वनमंत्री ईश्वर खंड्रे, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, माजी मंत्री दिलीपराव देशमुख, खासदार डॉ. भागवत कराड, खासदार रजनीताई पाटील, खासदार डॉ. अजित गोपछडे, खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार अमित विलासराव देशमुख, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार संजय बनसोडे, आमदार अभिमन्यू पवार, माजी केंद्रीय मंत्री भगवंत खुबा, माजी खासदार चंद्रकांत खैरे, नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, पंजाब पोलीस दलाचे उपमहानिरीक्षक इंदरवर सिंग, लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, मुंबई उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश नरेश पाटील, अखिल भारतीय काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनीही यावेळी शिवराज पाटील चाकूरकर यांच्या पार्थिवाला पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.

शिवराज पाटील चाकूरकर यांनी आपल्या सहा दशकांच्या राजकीय, सामाजिक जीवनात प्रामाणिकपणे देशाची सेवा केली. लोकसभेचे अध्यक्ष म्हणून काम करताना त्यांनी लोकशाहीचे मंदिर असलेल्या संसदेची प्रतिष्ठा कायम ठेवण्यासाठी भरीव योगदान दिले केला, संसदीय परंपरेला नवा आयाम दिला. संसदीय समित्यांसाठी त्यांनी पुढाकार घेतला. राजकारणातील त्यांचे योगदान नेहमीच स्मरणात राहील, अशा शब्दात लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.



## लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्यासह मान्यवरांनी घेतले अंत्यदर्शन

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले असल्याचे सांगून केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ म्हणाले की, राष्ट्रासाठी समर्पित भावनेने काम करणारा आणि लोकशाहीला मजबूत बनविण्यासाठी प्रयत्न करणारा एक विनम्र राजकारणी आपण गमावला आहे. त्यांच्या निधनाने मोठे नुकसान झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

शिवराज पाटील चाकूरकर यांच्यासोबत १९६७ पासून काम करण्याची संधी मिळाली. त्यांनी विविध पदांवर काम करताना समाजाची सेवा करत विकासासाठी भरीव योगदान दिले. त्यांची उणीव सदैव भासत राहील, असे राज्यसभा विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यावेळी म्हणाले.

चिंतनशील राजकारणी अशी ओळख असलेले शिवराज पाटील चाकूरकर हे आपल्यासाठी एक मार्गदर्शक, एक आदर्श होते. त्यांनी केंद्र सरकारमध्ये विविध मंत्री पदे भूषवत देशाची सेवा केली. लोकसभा अध्यक्ष असताना त्यांनी केलेले काम संस्मरणीय होते, असे सांगून कर्नाटक राज्याचे वनमंत्री ईश्वर खंड्रे यांनी त्यांना कर्नाटक सरकारच्यावतीने श्रद्धांजली अर्पण केली.

शिवराज पाटील चाकूरकर यांनी नगरपरिषदेचे अध्यक्ष ते लोकसभेचे अध्यक्ष पदापर्यंतच्या जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळल्या. अतिशय शिस्तप्रिय आणि वैचारिक मूल्य असणारे राजकारण, सर्वांशी असलेले जिव्हाळ्याचे संबंध हे शिवराज पाटील चाकूरकर यांच्या राजकीय जीवनाचे वैशिष्ट्य होते. त्यांचे आपल्यातून निघून जाणे अतिशय वेदनादायी असल्याचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण म्हणाले.

गेली सहा दशके राज्याची, देशाची प्रामाणिकपणे सेवा करताना शिवराज पाटील चाकूरकर यांनी शेतकरी, कष्टकरी, महिला, सुशिक्षित युवा वर्ग यांचे प्रश्न सोडविण्याला प्राधान्य दिले. जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांनी आपल्या पदांचा उपयोग केला. ते एक अजातशत्रू, चिंतनशील, अभ्यासू व तत्वनिष्ठ राजकारणी होते. त्यांची उणीव सर्वांना जाणवेल, अशी भावना माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी व्यक्त केली.

शिवराज पाटील चाकूरकर हे सुसंस्कृत राजकारणी म्हणून परिचित होते. लातूर जिल्ह्याच्या राजकारणाला सुसंस्कृत बनविण्यात त्यांचे योगदान मोठे आहे. त्यांच्या सुसंस्कृत नेतृत्वाचा वारसा पुढे घेऊन जाणे, हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असे आमदार संभाजी पाटील निलंगेकर यावेळी म्हणाले.

खासदार म्हणून काम करताना शिवराज पाटील चाकूरकर यांचे आपल्याला सदैव मार्गदर्शन लाभल्याचे माजी खासदार चंद्रकांत खैरे यावेळी म्हणाले. तसेच त्याबाबतच्या काही आठवणी त्यांनी सांगितल्या.

सुसंस्कृत आणि चारित्र्यसंपन्न राजकारणी अशी ओळख असलेल्या शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनाने सर्वत्र शोककळा पसरली आहे. त्यांच्या जवळपास साठ वर्षांच्या राजकारणात त्यांनी अनेकांना घडविले. त्यांच्या निधनामुळे मोठी पोकळी निर्माण झाल्याचे माजी मंत्री बसवराज पाटील यावेळी म्हणाले.

राज्य कृषि मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, कर्नाटकमधील आमदार बी. आर. पाटील, महाराष्ट्राचे माजी मंत्री बाळासाहेब जाधव, माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील, माजी खासदार डॉ. सुनील गायकवाड, माजी खासदार सुधाकर शृंगारे, माजी आमदार शिवाजी पाटील कव्हेकर, माजी आमदार बब्रुवान खंदाडे, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष तथा माजी आमदार धीरज विलासराव देशमुख यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, नागरिक उपस्थित होते.

## ट्युशन एरिया परिसरात पोलिसांची विशेष मोहिम

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १३ डिसेंबर :** लातूर शहरातील खाजगी शिकवणी वर्ग मोठ्या प्रमाणावर चालणाऱ्या परिसराला ' ट्युशन एरिया ' म्हणून ओळखले जाते. या परिसरात महिला, मुलींना टुकार तरुणांकडून छेडाछेडीच्या तक्रारी वारंवार केल्या जातात. त्यावर पूर्णतः निर्बंध आणण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून वेळोवेळी विशेष मोहिम आखल्या जातात. अशीच एक मोहिम नुकतीच पार पडली. यामध्ये १६ जणांवर महाराष्ट्र पोलीस अधिनियम अंतर्गत प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. या मोहिमेत ५ अधिकारी व ४३ पोलीस कर्मचारी सहभागी झाले होते.

लातूर शहर हे संपूर्ण राज्यात शैक्षणिक पॅटर्न साठी प्रसिद्ध असून राज्यभरातून हजारो विद्यार्थी लातूरमध्ये शिक्षणासाठी येतात. ट्युशन एरियामध्ये विद्यार्थ्यांची सतत मोठ्या प्रमाणावर गर्दी असते. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेस बाधा येऊ नये तसेच या परिसरात कोणीही असामाजिक तत्त्व सक्रिय होऊ नयेत यासाठी लातूर पोलिसांकडून सातत्याने विशेष मोहिम राबविण्यात येतात. या अनुषंगाने नुकतेच लातूर शहर पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर विशेष आणि भव्य मोहीम राबवली.या कारवाईचे मार्गदर्शन पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या निर्देशानुसार,अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण आणि उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे यांनी केले.



मोहीम राबविण्यास स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस ठाणे शिवाजीनगर, गांधी चौक पोलीस ठाणे आणि दंगा नियंत्रण पथकाचे पथक सहभागी झाले. यामध्ये स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर, पोलीस ठाणे शिवाजीनगर चे पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे यांच्यासह ५ अधिकारी व ४३ पेक्षा जास्त पोलीस कर्मचारी सहभागी होते.

ट्युशन एरियातील सर्व मुख्य रस्ते, गल्ली-बोळांचे संयुक्त निरीक्षण करून विद्यार्थी सुरक्षा, विनाकारण जमाव, गुंडगिरी यावर लक्ष केंद्रीत करत संशयितांची नोंद, पडताळणी आणि आवश्यक कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. विशेष मोहिमेदरम्यान विनाकारण फिरणे, विद्यार्थ्यांना त्रास देणे, गुंडगिरीची प्रवृत्ती, गैरवर्तन यामध्ये संशयित आढळलेल्या १६ जणांवर महाराष्ट्र पोलीस अधिनियम अंतर्गत प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. ही कारवाई ट्युशन एरियात सतत बेताल वर्तन करणाऱ्या आणि विद्यार्थ्यांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या असामाजिक तत्त्वांवर वचक बसवण्यासाठी करण्यात आली आहे.

लातूरमध्ये शिक्षणासाठी येणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांना भयमुक्त, सुरक्षित आणि शिस्तबद्ध शैक्षणिक वातावरण निर्माण करणे हा या मोहिमेमागील मुख्य हेतू आहे. त्यासाठी, ट्युशन परिसरातील असामाजिक तत्त्वांचे हालचाली रोखणे,विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षिततेचा विश्वास निर्माण करणे, परिसरात गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालणे या सर्व दिशांनी पोलिसांकडून पुढील काळातही अशा मोहीमा राबविण्यात येणार आहेत.

## लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास ऋषिकेश कराडांसह अनेकांकडून पुष्पांजली अर्पण



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १३ डिसेंबर :** ग्रामीण जनतेचे लोकाभिमुख लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंतीनिमित्त लातूर येथील जिल्हा परिषदेच्या प्रांगणातील पूर्णाकृती पुतळ्यास भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष तथा युवा नेते ऋषिकेश कराड यांच्यासह अनेकांनी पुष्पांजली अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांचा महाराष्ट्रातील शासकीय जागेत कदाचित पहिला भव्य पुतळा लातूर येथील जिल्हा परिषदेच्या प्रांगणात भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या पुढाकारातून उभारण्यात आला असून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या पुतळ्याचे नुकतेच अनावरण करण्यात आले आहे.

१२ डिसेंबर लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांचा जन्मदिवस निमित्ताने भाजपाचे युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांनी पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार घालून पुष्पांजली अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी भाजपाचे डॉ. बाबासाहेब घुले, प्रताप पाटील, विजयकुमार मलवाडे, सुरज शिंदे, भैरवनाथ पिसाळ, बाबासाहेब भिसे, शामसुंदर वाघमारे, सुकेश भंडारे, अमर चव्हाण, आदीनाथ मुळे, शहानुर बागवान, ललिता कांबळे, शिलाताई आचार्य, धनराज शिंदे, अशोक सावंत, शंकर चव्हाण, ज्ञानेश्वर जूगल, राम भताने, भागवत गिते यांच्यासह अनेकांनी पुष्पांजली अर्पण करून मुंडे साहेबांना विनम्र अभिवादन केले.

## तिरुपती-पंढरपूर साप्ताहिक रेल्वेसेवा २० डिसेंबरपासून

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १३ डिसेंबर :** येत्या दि.२० डिसेंबर २०२५ पासून तिरुपती - पंढरपूर व्हाया लातूर साप्ताहिक रेल्वेसेवा सुरु होणार आहे. यापूर्वी ही सेवा १३ डिसेंबरला सुरु होणार होती, मात्र ही रेल्वेसेवा आता २० तारखेपासून सुरु होत असल्याची माहिती मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागीय सल्लागार समितीचे सदस्य संजय निलेगांवकर यांनी दिली.

तिरुपती - पंढरपूर ही गाडी लातूरमार्गे सुरु करण्यात यावी, अशी मागच्या अनेक वर्षांपासूनची प्रवाशांची मागणी होती. रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य संजय निलेगांवकर यांनी रेल्वे सल्लागार समितीच्या महत्वपूर्ण बैठकीत ही मागणी आग्रहाने लावून धरली होती. त्यांनी ही रेल्वेसेवा लातूरमार्गे तिरुपती- पंढरपूर - तिरुपती सुरु करण्याच्या दृष्टीने सकारात्मक प्रयत्न केले. त्यांच्या मागणीनुसार दक्षिण मध्य रेल्वे विभागाने गाडी क्रमांक ०७०१२ व ०७०३२ ही तिरुपती - पंढरपूर - तिरुपती साप्ताहिक रेल्वे सेवा लातूरमार्गे सुरु करण्यास नुकतीच मंजुरी दिली आहे. ही गाडी यापूर्वी दि. दि. १३ डिसेंबर २०२५ शनिवार पासून सुरु होणार होती. मात्र आता ती येणाऱ्या शनिवारपासून म्हणजे दि. २० डिसेंबर पासून सुरु होत आहे. गाडी क्रमांक ०७०१२ ही दि. २० डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ४ वाजून ४० मिनिटांनी तिरुपतीहून सुटेल.

या गाडीला रेणिगुंटा, राजमपेटा, ओंटिमिट्ट, कडपा, येरगुंटला, ताडिपत्रि, गूटी, डोन, कर्नूलु सिटी, गदवाल, वनपर्ती रोड, महबूबनगर, जडचर्ला, शादनगर, उमदानगर, काचीगुडा, सिकंदराबाद, बेगमपेट, लिंगमपल्ली, शंकरपल्ली, विकाराबाद, जहीराबाद, बीदर, भालकी, उदगीर, लातूर रोड, लातूर, धाराशिव, बार्शी टाऊन, कुर्डूवाडी, मोडलिंब असे थांबे देण्यात आले आहेत.




यामध्ये धाराशिव आणि बार्शी हे दोन थांबे वाढविण्यात आले आहेत. अगोदरच्या वेळापत्रकात हे थांबे नव्हते. ही एक सुविधा या गाडीसाठी वाढविण्यात आली आहे. ही गाडी दुसऱ्या दिवशी म्हणजे दि. २१ डिसेंबर रोजी दुपारी २ वाजून २० मिनिटांनी लातूर स्थानकावर पोहचेल. ही गाडी सायंकाळी ६ वाजून ५० मिनिटांनी पंढरपूर स्थानकावर पोहचेल. गाडी क्रमांक ०७०३२ ही दर रविवारी पंढरपूरहून रात्री आठ वाजता निघेल. ही गाडी मध्यरात्री १२ वाजून १० मिनिटांनी लातूर रेल्वे स्थानकावर पोहचेल तर दुसऱ्या दिवशी म्हणजे सोमवारी रात्री साडेदहा वाजता तिरुपती स्थानकावर पोहचेल.

या गाडीला एक एसी प्रथमवर्ग, एक एसी फर्स्ट कम टू टिअर , दोन एसी टू टिअर , ३ एसी थ्री टिअर , १४ स्लीपर क्लास, दोन द्वितीय श्रेणी जनरल , २ गार्ड कम ब्रेक व्हॅन असे एकूण २४ डबे असणार आहेत. ही सुविधा तूर्तास दि. २० डिसेंबर ते दि. १ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत सुरु असणार आहे.

प्रवाशांच्या मिळणाऱ्या प्रतिसादावर या गाडीची पुढील रूपरेषा निश्र्चित केली जाणार असल्याचे संजय निलेगावकर यांनी सांगितले. रेल्वे प्रवाशांसाठी अतिशय आनंदाची आणि समाधानाची बाब म्हणजे येत्या शनिवारी निघणाऱ्या गाडीचे आरक्षण फुल्ल या झाल्याची माहिती निलेगांवकर यांनी दिली. प्रवाशांकडून असाच प्रतिसाद मिळाल्यास ही गाडी पुढील काळात नियमित करण्यासाठी आपण सर्वतोपरी प्रयत्न करू असेही संजय निलेगांवकर यांनी सांगितले.

# एमजीएममध्ये मराठवाडा विभागीय स्त्री मुक्ती परिषद यशस्वीपणे संपन्न





**छत्रपती संभाजीनगर, दि.१३ :** एमजीएम विद्यापीठ आणि महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेली एक दिवसीय विभागीय पातळीवरील मराठवाडा स्त्री मुक्ती परिषद यशस्वीपणे संपन्न झाली. या परिषदेत मराठवाड्यातील विविध स्त्री संघटना सहभागी झाल्या होत्या आणि स्त्रियांच्या समस्यांवर आणि विशेषतः मराठवाड्यातील स्त्री प्रश्नावर यामध्ये चर्चा करण्यात आली. या परिषदेचे उद्घाटन आईनस्टाईन सभागृह येथे मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.

यावेळी, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषदेच्या डॉ. छाया दातार, सुनिता बागल, सामाजिक कार्यकर्त्या दिशा पिंकी शेख, अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके व सर्व संबंधित उपस्थित होते. मराठवाड्यातील स्त्रीयांचे प्रश्न व जात वास्तव या विषयावर नांदेड येथील डॉ. सुप्रिया गायकवाड यांनी मांडणी केली. यानंतर विविध ज्वलंत प्रश्नावर गटचर्चेचे आयोजन करण्यात आले होते.

सामाजिक शास्त्रे व मानव्यविद्या अभ्यास शाखेच्या अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके, आंतरविद्याअभ्यास शाखेचे अधिष्ठाता प्रोफे. डॉ.जॉन चेलादुराई व सर्व संबंधितांची उपस्थिती या परिषदेला होती. वसुधा कल्याणकर आणि सहकारी यांनी सादर केलेल्या प्रबोधन गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आले.

त्याचप्रमाणे सर्व धर्मातील, सर्व वर्गातील, सर्व घटकातील, सर्व वयोगटात नागरिकांनी एकत्रित येत भारतीय संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन करून प्रातिनिधिक स्वरूपात या परिषदेचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी बोलताना कुलगुरू डॉ. विलास सपकाळ म्हणाले, एमजीएम विद्यापीठात महिला मोठ्या प्रमाणात काम करीत असून तीन अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रमुखपद महिलांच्या हाती आहे. जिल्हा, विभागीय, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर खूप चांगल्या प्रकारे आयोजन आपण केले आहे. महिलांना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिकदृष्ट्या सक्षम करणे आवश्यक आहे. महिला आज ग्लोबल कनेक्ट होताना दिसत असून ब्लॉग रायटिंग, संशोधन अशा विविध क्षेत्रात त्या मोठ्या प्रमाणात यशस्वी होत आहेत.

मराठवाड्यातील स्त्री मुक्ती चळवळ खूप जुनी असून स्त्री वादी विचारांच्या पुरुषांनी आणि स्त्रियांनी या मातीत ही चळवळ रुजवली आहे. मराठवाड्यातील आज सहभागी झालेल्या या स्त्रिया पुढील ५० वर्ष मराठवाड्याचे नेतृत्व करणार असल्याचे सुनिता बागल यांनी यावेळी सांगितले.

महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषदेच्या डॉ. छाया दातार यावेळी बोलताना म्हणाल्या, मराठवाड्यातील स्त्रियांमध्ये खूप मोठ्या प्रमाणात उत्साह आहे. आज या परिषदेत सहभागी झालेल्या महिला या फातिमा शेख, पंडिता रमाबाई, सावित्रीबाई फुले यांच्या प्रेरणेने काम करणाऱ्या आहेत. १९७५ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने घोषित केलेल्या आंतरराष्ट्रीय महिला वर्षाला २०२५ मध्ये पन्नास वर्ष पूर्ण होत आहेत. यानिमित्ताने स्वातंत्र्यपूर्व काळापासून कार्यरत असलेल्या स्त्री संघटना आणि व्यक्तींनी एकत्र येऊन पन्नास वर्षात स्त्रियांच्या जीवनातील परिवर्तनाचा परामर्श घेण्यासाठी मागील वर्षभरात महाराष्ट्रात अनेक विभागामध्ये विभागीय पातळीवरील स्त्री प्रश्र्न अधोरेखित करण्यासाठी परिषदा पार पडल्या असून, २०,२१ व २२ डिसेंबरला राज्य पातळीवरील महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषद मुंबई येथे होणार आहे.

विभागीय पातळीवरील मराठवाडा स्त्री मुक्ती परिषदेसाठी मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यामधून महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. मंजूश्री लांडगे यांनी केले. ठरावांचे वाचन डॉ. अरुंधती पाटील यांनी तर आभार जिल्हा समन्वयक तिलोत्तमा झाडे यांनी मानले.

## ग्रामपंचायतकडून घरपट्टी-पाणीपट्टीवर ५० टक्के सवलतीचा ठराव

**तभा वृत्तसेवा**

**बिडकीन, दि १३ डिसेंबर :** राज्यातील ग्रामपंचायतीच्या थकीत करवसुलीला गती देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ऐतिहासिक निर्णय घेतला आहे, निवासी मलामत्ता कर घरपट्टी, पाणीपट्टी,आणि दिवाबत्ती कर या सर्वावर एकरकमी भरपाई केल्यास थकीत रकमेवर थकीत रकमेवर तब्बल ५० टक्के सवलत देण्याची घोषणा करण्यात आली आहे. ही योजना ३१ डिसेंबर २०२५ पर्यंतच लागू राहणार आहे. या आदेशाची अंमलबजावणी दि १३ नोव्हेंबर रोजी करण्यात आली आहे.

यावरून पैठण तालुक्यातील बिडकीन ग्रामपंचायत सरपंच अशोक धर्मे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामसभा घेऊन ग्रामविकास अधिकारी मंचन भोसले यांनी कर वसुलीवर ५० % सवलत देण्याची घोषणा केली आहे. तसेच फारोळा ग्रामपंचायत सरपंच सलीम पठाण व ग्रामविकास अधिकारी आशा तुपे यांनी ग्रामसभा घेऊन सवलत देण्याविषयी ठराव घेण्यात आला आहे. यामुळे पाणीपुरवठा, रस्ते, वीजबिल, कर्मचारी पगार यांसारख्या नियमित कामांमध्ये अडचणी निर्माण होत आहेत.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत गांवाचा आर्थिक पाया मजबूत करण्यासाठी ही सवलत देण्यात आली आहे, तरी या योजनेचा लाभ घेऊन आपली थकीत असलेली बाकी ५० % रक्कम दि ३१ डिसेंबर पर्यंत जमा करण्यात यावी असे बिडकीन ग्रामपंचायत सरपंच अशोक धर्मे ग्रामविकास अधिकारी मंचन भोसले व फारोळा ग्रामपंचायत सरपंच सलीम पठाण, ग्रामविकास अधिकारी आशा तुपे, यांनी आवाहन केले आहे.



## रिंकू राजगुरूची 'आशा' १९ डिसेंबरला प्रदर्शित

छत्रपती संभाजीनगर - रिंकू राजगुरू अभिनीत 'आशा' चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित होताच प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.



'बाई अडलीये म्हणूनच ती नडलीये' ही प्रभावी टॅगलाईन महिलांच्या संघर्षाची धार अधोरेखित करते. गावोगावी आरोग्य सेवा देणारी सेविका, कुटुंब व समाजातील अन्यायाशी दोन हात करणारी धाडसी स्त्री अशी 'आशा' अनेक महिलांचे प्रतीक ठरते.

चित्रपटात महिलांचा संघर्ष, जिद्द, भावनिक ताणतणाव आणि आत्मसन्मानाची लढाई वास्तववादी पद्धतीने मांडण्यात आली आहे. 'चालत रहा पुढे' हे प्रेरणादायी गाणे सध्या विशेष चर्चेत आहे. रिंकू राजगुरूसह सायंकित कामत, उषा नाईक, शुभांगी भुजबळ आदी कलाकारांच्या भूमिका लक्षवेधी आहेत.

दिग्दर्शक दिपक पाटील यांच्या दिग्दर्शनाखालील हा चित्रपट पॅनोरमा स्टुडिओजद्वारे १९ डिसेंबर रोजी प्रदर्शित होत असून 'आशा' ही केवळ एका व्यक्तीची नव्हे, तर संघर्ष करणाऱ्या असंख्य महिलांची कथा असल्याचे चित्रपटाचे वैशिष्ट्य आहे.

## नव्या तंत्रज्ञानाचा सर्वसामान्यांपर्यंत प्रसार गरजेचा : डॉ. सूर्यवंशी



**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि १३ डिसेंबर :** वैद्यकीय क्षेत्रात नावीन्यपूर्ण तंत्रज्ञान झपाट्याने विकसित होत असून त्याचा प्रभावी प्रसार तळागाळातील रुग्णांपर्यंत होणे अत्यावश्यक आहे. असे झाल्यास उपचार अधिक सुलभ, सुरक्षित आणि परिणामकारक ठरतील.

एंडोव्हॅस्क्युलर समिटसारख्या व्यासपीठांमुळे ज्ञान-विनिमय, कौशल्य-विकास आणि इनोव्हेशनचे प्रभावी एकत्रीकरण होते, असे प्रतिपादन एमजीएम रुग्णालयाचे उप-अधिष्ठाता डॉ. प्रवीण सूर्यवंशी यांनी केले. ते मराठवाडा एंडोव्हॅस्क्युलर समिट ३.० च्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

इंटरव्हेन्शनल रेडिओलॉजी विभाग, एमजीएम मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल, इंडियन मेडिकल असोसिएशन यांच्या सहकार्याने आयोजित या परिषदेत रक्तवाहिनीविज्ञान, ऑन्कोलॉजी, एंडोव्हॅस्क्युलर उपचार व अल्ट्रासाऊंड तंत्रज्ञानातील अद्ययावत प्रवाहांवर सखोल चर्चा झाली. यावेळी अधिष्ठाता डॉ. राजेंद्र बोहरा, डॉ. शिवाजी पोळे, डॉ. गिरीश गाडेकर, आयएमए अध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर, सचिव डॉ. योगेश लक्कस आदी मान्यवर उपस्थित होते.

सकाळच्या सत्रात व्हॅस्क्युलर कलर डॉपलर, रक्तवाहिन्यांतील गाठी व आधुनिक उपचारपद्धतींवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. दुपारनंतर पेपर, केस, ई-पोस्टर सादरीकरण आणि प्रात्यक्षिक कार्यशाळेमुळे राज्यभरातील डॉक्टरांना नव्या उपचार रणनीतींचा थेट लाभ होणार आहे.

यावेळी असोसिएशन ऑफ सर्जन इंडियाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल डॉ. प्रवीण सूर्यवंशी यांचा 'वसुदैव शल्यचिकित्सक पुरस्कार' देऊन विशेष सन्मान करण्यात आला.

## आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २८ जानेवारी ते १ फेब्रुवारी दरम्यान

**छत्रपती संभाजीनगर, दि.१३ :** जगभरातील सर्वोत्कृष्ट चित्रपट मराठवाड्यातील रसिकांपर्यंत पोहोचवणार्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या तारखांची आयोजकांच्या वतीने घोषणा करण्यात आलेली असून बुधवार, दि. २८ जानेवारी ते रविवार, दि. ०१ फेब्रुवारी २०२६ दरम्यान हा महोत्सव रुक्मिणी सभागृह, एमजीएमपरिसर व आयनॉक्स थिएटर प्रोझोन मॉल, छत्रपती संभाजीनगर येथे राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरील कलावंताच्या मांदियाळीत संपन्न होणार आहे.

नाथ ग्रुप, महात्मा गांधी मिशन, यशवंतराव चव्हाण सेंटर व मराठवाडा आर्ट कल्चर व फिल्म फाउंडेशन आयोजित अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव हा भारत सरकार व महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने संपन्न होत असून प्रोझोन मॉल यांचे विशेष सहकार्य या फेस्टिव्हलला मिळालेले आहे. एनएफडीसी व महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ, महाराष्ट्र शासन यांची सहप्रस्तुती असणार आहे. डेली हंट यांची माध्यम प्रस्तुती असणार आहे.

आजपर्यंतचे जागतिक दर्जाचे सर्वोत्कृष्ट चित्रपट छत्रपती संभाजीनगरच्या रसिकांपर्यंत पोहोचावेत, चित्रपट दिग्दर्शक, तंत्रज्ञ, कलावंत व युवा पिढीतील सिनेमाची आवड असणार्या कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळून कला व तांत्रिक पातळीवर चित्रपटाचे रसग्रहण होत चित्रपट जाणिवा अधिक सशक्त व समृद्ध व्हाव्यात, मराठवाडा व छत्रपती संभाजीनगरचे नाव चित्रपटाच्या निर्मितीच्या अंगाने सांस्कृतिक केंद्र म्हणून व प्रोडक्शन हब म्हणून जागतिक पातळीवर पोहोचावे, छत्रपती संभाजीनगर शहरातील पर्यटन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील पर्यटकांपर्यंत पोहोचावे, मराठवाडा विभागातील गुणवंत कलावंतांना चित्रपट दिग्दर्शक, चित्रपट विषयातील तज्ज्ञ व तंत्रज्ञांपर्यंत पोहोचता यावे, त्यांच्यासोबत संवाद साधता यावा तसेच आताचा मराठी सिनेमा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत पोहोचावा, हा या महोत्सव आयोजनामागे उद्देश आहे.

पद्मपाणी जीवनगौरव पुरस्कार, सुवर्ण कैलास सर्वोत्तम चित्रपट पुरस्कार, भारतीय सिनेमा स्पर्धा,जागतिक सिनेमा विभाग,रेट्रोस्पेक्टीव्ह, ट्रिब्युट, मास्टर क्लास, विशेष व्याख्यान, स्पेशल स्क्रिनिंग, परिसंवाद , पोस्टर प्रदर्शन अशा विविध कार्यक्रमांची रेलचेल यावर्षीच्या महोत्सवात असणार आहे. त्यासंदर्भातील अधिक तपशील लवकरच जाहीर करण्यात येईल असे आयोजकांनी कळविले आहे. या महोत्सवात महाराष्ट्रातील सिनेरसिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन महोत्सवाच्या आयोजन समितीचे संस्थापक अध्यक्ष नंदकिशोर कागलीवाल, प्रमुख मार्गदर्शक अंकुशराव कदम, मानद अध्यक्ष आशुतोष गोवारीकर, सुनील सुकथनकर, चंद्रकांत कुलकर्णी, नीलेश राऊत आदींनी केले आहे.

## कालव्यात आढळला अनोळखी मृतदेह

**पैठण, दि १३ :** पैठणच्या डाव्या कालव्यात इंदेगांव शिवारात शनिवारी दुपारी अंदाजे ४५ वर्षाच्या अनोळखी पुरुषाचे मृतदेह पाण्यावर तरंगतांना आढळून आले असून मृतदेहाच्या उजव्या हातावर रेश्मा सुमित असे गोंधलेले आहे.याप्रकरणी पोलीस पाटील यांच्या खबरी वरून पैठण पोलिसात नोंद करण्यात आली आहे. पोलीस ठाणे पैठण हद्दीमध्ये इंदेगाव शिवार येथे कॅनाल मध्ये नमूद अनोळखी व्यक्ती चा मृत देह मिळून आला असून सदर व्यक्ती कोणाच्या ओळखीचा असेल तर त्यांनी पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांच्याशी मोबाईल क्रमांक ९०४९९८०७५५ यावर संपर्क साधावा.

**AHILYANAGAR MUNICIPAL CORPORATION**
**AHILYANAGAR**

**Atirikt Chatai Kshetra Nirdeshan Poti Premium Rakametun Kame Karne - Year 2025 - 26**
**E Tender Notice no. 451 Year 2025 - 26**

E Tender Notice no. 451 Year 2025 - 26 has been published on the government's website http://mahaetenders.gov. in for online bidding through e-tender mode.
However, it should be noted those concerned.

**City Engineer**
**Ahilyanagar Municipal Corporation**
**Ahilyanagar**

## थोडक्यात...

### भगवंत प्राप्तीसाठी भक्ती हाच सुलभ मार्ग – ह.भ.प. सुनील महाराज आष्टीकर



**बिडकीन :** आपला जन्म कलियुगात झाला असल्यामुळे आयुष्य जरी कमी असंले तरी भगवत प्राप्तीचे साधन सोपे आहे. कलयुगी उध्दार हरीच्या नामे या न्यायाने परस्परांतील मतभेद बाजूला ठेवून एकमेकांच्या अडीअडचणींमध्ये मदत करुन सार्थकी जीवन जगले पाहिजे. समाजसेवा भगवंताला जास्त आवडते. योग याग विधी येणे नोव्हे सिध्दि म्हणुन समाज सेवेसोबतच भक्ती करा आणि हाच भगवंत प्राप्तीचा साधा सोपा व सुलभ मार्ग आहे असे प्रतिपादन भागवताचार्य ह भ प सुनील महाराज आष्टीकर यांनी कृष्णापुर येथे अखंड हरिनाम सप्ताहात आयोजित श्रीमद् भागवत कथे दरम्यान केले. यावेळी कथेचे यजमान माजी सरपंच विष्णु जाधव, सप्ताह मार्गदर्शक ह.भ.प. संजय महाराज जाधव, सिताराम आव्हाड, संभाजी जाधव, अंकुश काळे, राजु जाधव, भाऊसाहेब शेळके, दत्तात्रेय बोडखे आदींसह भाविक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

### किराणा दुकानात अवैधरित्या मांजा विक्री; २,७२० रुपयांचा मुद्देमाल जप्त

**कन्नड :** शहरातील पांढरी मोहल्ला परिसरात मांजा विक्री करणाऱ्यावर कन्नड शहर पोलिसांनी कारवाई केली आहे. मुजकीर युनूस खान (वय ४३ वर्षे, रा. पांढरी मोहल्ला, कन्नड) हा आपल्या किराणा दुकानात अवैधरित्या मांजा विक्री करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्या अनुषंगाने कन्नड शहर पोलिसांनी छापा टाकून कारवाई केली असता दुकानातून २,७२० रुपयांचा मांजा व इतर साहित्य असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई पोलिस उपनिरीक्षक चांद मेंडके, सहाय्यक फौजदार केशरसिंग जारवाल, नासेर पठाण व विशाल लोंढे यांच्या पथकाने केली. या प्रकरणी केशरसिंग जारवाल यांच्या फिर्यादीवरून कन्नड शहर पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील अधिक तपास सहाय्यक फौजदार नासेर पठाण हे करत आहेत.

### बुलढाणा अर्बनचा नवा सामाजिक उपक्रम 'बुलढाणा अर्बन परिणय' सुरू

**सोयगाव :** बुलढाणा अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीने समाजाभिमुख उपक्रमांच्या धोरणात्मक अंमलबजावणीत आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठत 'बुलढाणा अर्बन परिणय' हा नवा उपक्रम सुरू केला आहे. सध्याच्या काळात विवाह इच्छुक मुला-मुलींची योग्य जुळवणी करणे हे पालकांसाठी मोठे आव्हान बनले असून, ही सामाजिक गरज ओळखून संस्था पुढाकार घेत आहे.या उपक्रमांतर्गत विवाह इच्छुक वधू-वरांची नोंदणी करण्यात येणार असून, पालकांना सुलभ व पारदर्शक माहिती मिळावी यासाठी संस्थेने विशेष मोबाईल प विकसित केले आहे. या पद्वारे योग्य वधू-वर निवडण्याची प्रक्रिया अधिक कार्यक्षम व संरचित स्वरूपात राबवली जाणार आहे. नोंदणीसाठी नाममात्र शुल्क आकारण्यात येणार आहे. संस्थेचे तब्बल १८ लाख सभासद, त्यांचे नातेवाईक व परिचित या योजनेचा लाभ घेऊ शकतात. या उपक्रमाचा व्यापक प्रचार करून अधिकाधिक विवाह जुळवण्याचा संकल्प संस्थेने व्यक्त केला आहे. हा उपक्रम समाजऋण फेडण्याचा एक सकारात्मक आणि प्रभावी मार्ग असल्याचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक व अध्यक्ष सुकेशजी झंवर यांनी स्पष्ट केले.

### ॲक्सिस गोल्ड अँड सिल्व्हरपॅसिव्ह फंड ऑफ फंड्सची घोषणा

**मुंबई :** देशातील आघाडीच्या मालमत्ता व्यवस्थापन कंपन्यांपैकी एक असलेल्या क्सिस म्युच्युअल फंडने आज क्सिस गोल्ड अँड सिल्व्हर पॅसिव्ह फंड ऑफ फंड सुरू करण्याची घोषणा केली. ही ओपन-एंडेड फंड ऑफ फंड्स योजना असून, त्यामध्ये सोने आणि चांदीच्या एक्स्चेंज ट्रेडेड फंड्सच्या युनिट्समध्ये गुंतवणूक केली जाणार आहे. या योजनेचा न्यू फंड ऑफर सबस्क्रिप्शनसाठी १० डिसेंबर २०२५ रोजी खुला होणार असून तो २२ डिसेंबर २०२५ रोजी बंद होईल. क्सिस गोल्ड अँड सिल्व्हर पॅसिव्ह त्रेझ्र याद्वारे गुंतवणूकदारांना एकाच गुंतवणूक पर्यायातून सोने आणि चांदी- जगभरात मूल्य साठवणुकीचे विश्वासार्ह माध्यम मानले जाणारे दोन प्रमुख कमोडिटीज-यांच्या कामगिरीत सहभागी होता येणार आहे. ही योजना पारदर्शक आणि सोयीस्कर पद्धतीने कमोडिटी गुंतवणुकीची संधी उपलब्ध करून देईल. या योजनेत प्रामुख्याने गोल्ड एढऋ आणि सिल्व्हर एढऋ च्या युनिट्समध्ये गुंतवणूक केली जाणार असून, दोन्ही कमोडिटीजमध्ये संतुलित वाटप ठेवण्यावर भर दिला जाणार आहे.

### एमईए इंटरनॅशनल बिझनेस एक्स्पोमुळे मराठवाड्यातील उद्योजकांना मोठ्या संधी

**छत्रपती संभाजीनगर :** एमईए तर्फे २७ फेब्रुवारी ते १ मार्च २०२६ दरम्यान पुण्यात आयोजित करण्यात येणाऱ्या एमईए इंटरनॅशनल बिझनेस एक्सपो विषयी माहिती देण्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथे विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीत मराठा समाजातील उद्योजकांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. पुण्यासारख्या शहरात मराठा उद्योजकांनी एकत्र येऊन मजबूत उद्योजक समाज उभारण्यासाठी घेतलेला पुढाकार खरोखरच प्रशंसनीय असल्याचे मत उद्योजक मानसिंग पवार यांनी व्यक्त केले.

### १५ वर्षांसाठी ब्रँड भागीदारी वाढवली

**मुंबई :** कार इन्फोटेनमेंट आणि ऑडिओ ॲक्सेसरीजमध्ये जागतिक स्तरावर विश्वासार्ह नाव असलेल्या ब्लॉपंक्ट न बीपीआयएन प्रायव्हेट लिमिटेडसोबतच्या भागीदारीचा २०४१ पर्यंत विस्तार करण्याची घोषणा केली आहे. हे नावीन्यपूर्णता, विश्वास आणि भारतीय ग्राहकांना जागतिक दर्जाचे ऑटोमोटिव्ह सोल्यूशन्स प्रदान करण्यासाठी सामायिक दृष्टिकोनावर आधारित २७ वर्षांच्या भागीदारीवर उभारणी करण्याच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकते. हा नूतनीकरण केलेला करार ब्लॉपंक्टची भारताच्या वेगाने बदलणाऱ्या ऑटोमोटिव्ह इकोसिस्टमसाठीची वचनबद्धता मजबूत करतो आणि एक प्रमुख वाढ भागीदार म्हणून बीपीआयएनची भूमिका अधोरेखित करतो.

### सोलापूरमध्ये रस्ते सुरक्षा जागरूकतेस प्रोत्साहन देते

**सोलापूर:** होंडा मोटरसायकल एंड स्कूटर इंडिया ने रस्ते सुरक्षा वर्तन वाढवण्यासाठी आपला राष्ट्रीय स्तरावरील उपक्रम विस्तारित केला आणि सोलापूर, महाराष्ट्रातील छत्रपती शिवाजी प्राशाला, नागेश करजगी ऑर्चिड स्कूल आणि दमानी विद्या मंदिर येथे एक प्रभावी रस्ते सुरक्षा जागरूकता मोहिम आयोजित केली. या उपक्रमात २४०० पेक्षा जास्त सहभागी सहभागी झाले आणि सुरक्षित सवारीच्या मूलभूत तत्त्वांविषयी शिकले, ज्यामुळे शिकण्याचे आणि रस्त्यावर सामायिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणारे वातावरण तयार झाले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# कुत्र्याच्या मौतीनं मेलात तरी कुत्रं विचारणार नाही!

'एव्हरी डॉग हॅज इट्स डे', अशी इंग्रजी म्हण आहे. कधी ना कधी प्रत्येकाला संधी मिळतेच, असा तिचा अर्थ. काही वेळा ती नकारात्मकरीत्या वापरली जाते. लायकी नसताना एखादी गोष्ट एखाद्याच्या हाती लागली तर हीच म्हण वेगळ्या संदर्भासह वापरतात. पण, सध्याचा काळ असा आहे की, 'डॉग्ज हॅव ऑल देअर डेज टू बाईट एनीबडी!...' सर्वत्र कुत्र्यांचेच दिवस आहेत. कुत्र्यांबद्दलच्या म्हणी इंग्रजीत आहेत, तशा अन्य भाषांतही आहेत. मराठी म्हणींच्या विश्वात आणि फिल्मी संवादात तर कुत्र्यांचा मुक्त संचार आहे. 'आंधळे दळते, कुत्रे पीठ खाते' इथपासून 'तुला कुत्रं विचारत नाही' ते 'कुत्ते की मौत मरेगा तू... ' किंवा 'कुत्ते मैं तेरा खून पी जाऊंगा' इथपर्यंत सर्वत्र कुत्रेच कुत्रे! माणसांचे माहिती नाही, पण सध्या कुत्र्यांचेच 'अच्छे दिन' आले आहेत. त्यांचा संचार आता गाव-शहरांच्या गल्ल्यांपर्यंत वाढलाय. ते इवल्या-इवल्या मुलांचे लचके तोडत आहेत, वृद्धांना जिवानिशी ठार करीत आहेत. ही समस्या गंभीर आहे, हे मानायला आपले मायबाप सरकार तयार नाही. सर्वोच्च न्यायालय ते राज्याचे विधिमंडळ पातळीवर त्यांच्यासाठी चर्चा झाल्या. काल-परवा हिवाळी अधिवेशनात वाघ-बिबट्यांसह भटके कुत्रेही गाजले. या विषयावर बैठक होणार आहे म्हणतात. मग एखादी समिती नेमली जाईल, तिचा अहवाल पुढच्या वर्षी येईल, मग त्या अहवालावर विचार करण्यासाठी एखादा अभ्यासगट, त्या अभ्यासगटाच्या शिफारसींचा विचार करण्यासाठी उपगट... असेच हे सुरू राहणार आहे. तरीही आपण मात्र सरकारी कामाची ही पद्धत समजून घ्यायला हवी. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर सरकारने जीआर काढला ही केवढी मोठी कामगिरी. पण, त्याचे सामान्यांना कौतुक नाही. त्याच्या अंमलबजावणीकडे कुणाचे लक्ष नाही हा भाग सोडा. कारण सरकारकडे तेवढा वेळच नाही! २०२४ मध्ये देशभरात ३७ लाख लोकांना कुत्र्यांनी चावा घेतला. छोट्या मुलांचे जीव कुत्र्यांनी घेतल्याच्या घटना घडल्या. जगभरात दरवर्षी कुत्रे चावल्यामुळे साठ हजारावर मृत्यू होतात, असे आकडेवारी सांगते. पण, काहीही घडू द्या; आंधळे दळते आणि कुत्रे पीठ खातेच! जागतिक आरोग्य संघटना म्हणते की, जगभरात रेबीजने जेवढे मृत्यू होतात, त्यापैकी ३६ टक्के एकट्या भारतात होतात. त्यातही महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, बिहारसारख्या राज्यांत कुत्रे चावण्याच्या आणि त्यामुळे मृत्यू झाल्याच्या घटनांचे प्रमाण अधिक आहे. विकासाच्या दिशेने वेगाने घोडदौड करीत असलेल्या महाराष्ट्राची तुलना यूपी-बिहारशी याबाबतीत व्हावी, याचे वाईट वाटते. पण, त्याची दखल घेणार कोण? एकट्या चंद्रपूर जिल्ह्यात पाच-सहा वर्षांत ४४ हजार कुत्र्यांनी लोकांना चावा घेतला. गेल्या सहा-सात वर्षांत एकट्या महाराष्ट्रात तीस लाखांवर कुत्र्यांनी माणसांना चावा घेतला. दररोजच्या श्वान चाव्यांची सरासरी संख्या १३०० च्या वर. संशोधकांचा असा अंदाज आहे की, लांडगा हा कुत्र्यांचा पूर्वज असावा. कुत्रा आत्ता-आत्तापर्यंत निष्ठावंत-प्रेमळ वगैरे वागला. आता तो त्याच्या पूर्वजासारखा वागून लांडग्यागत लचके तोडू लागला आहे. त्याच्याबद्दलचा हळवा भाव आता कामाचा नाही. पण, सरकारला हळवे राहण्याशिवाय पर्याय दिसत नाही. कुत्र्यांच्या उत्पत्तीवर कुणाचेच नियंत्रण नाही. वाघाने-बिबट्याने मारले तर २५ लाख मिळतात. ७५ वर्षांचा माणूस मेला तरी २५ लाख, तरणाबांड माणूस जिवानिशी गेला तरी तेवढेच. छोटा असला तरी २५ लाख. हे तार्किकदृष्ट्या बरोबर नाही. एखाद्याचे उर्वरित आयुष्य लक्षात घेऊन भरपाई दिली पाहिजे आणि त्यासोबत काही निश्चित रक्कम अनुदान म्हणून दिली पाहिजे. पण, हे सारे ठरते मंत्र्यांच्या घोषणेवर. गेल्या दोनेक दशकांत वनमंत्र्यांच्या औदार्यामुळे दोन-तीन लाखांवरून वाढत-वाढत ही भरपाई २५ लाखांवर आली. आता २५ चे ५० लाख होतील की १ कोटी होतील, एवढेच आपण पाहायचे. खरे तर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशामुळे हा विषय अजेंडावर तरी आला. तोवर कायदा होता, कुत्रे होते आणि सरकारही होते. पण, काहीच घडत नव्हते. कुत्र्यांच्या निर्बीजीकरणाची किंवा रेबीजच्या लसींची सोय जिल्हास्थानी जेमतेम आहे. त्याखाली तर ती जवळजवळ नाहीच.

वाघ-बिबटे गावाकडे येऊ लागले आणि शहरांमध्ये तर भटक्या कुत्र्यांचे थैमान. दुसरीकडे श्वानप्रेमी मंडळी कोकलत असतात. ज्यांनी कुत्री पाळली आहेत, त्यातील बहुतांशी लोक त्यांना इतरांना चावे घेण्यासाठी सोडून देतात. कुत्र्याने चावा घेतलेली व्यक्ती रेबीजने तडफडून मरते. पण, त्यांचा कुणीही वाली नाही. सरकारकडे तर अशा किरकोळ गोष्टींसाठी वेळच नाही. त्यामुळे अशा जिवांना कुत्रं विचारत नाही आणि अक्षरश: सांगायचे तर कुत्रेही त्यांचे हाल खात नाहीत. आता नवे पिल्लू सोडले गेले. जंगलांमधून बिबटे गावात येतात तर त्यांच्यासाठी जंगलातच कुत्रे सोडा म्हणतात. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाला हे मान्य नाही. तसे केले तर कुत्र्यांचे भयंकर आजार जंगलातल्या प्राण्यांना होऊ शकतील. खरे तर बिबटे हे गावांमध्ये कुत्र्यांना खायला येत आहेत. गावांमधील कुत्र्यांची संख्या कमी झाली तर बिबटे येणार नाहीत. मग टूम निघाली की, बकऱ्या जंगलात सोडा म्हणजे वाघ गावांकडे येणार नाहीत. त्यासाठी पशुसंवर्धन खात्याला टेंडर वगैरे काढावे लागेल. शिवाय, जंगलात सोडलेल्या बकऱ्या वाघांनी खाल्ल्या की माणसांनी हे पाहायचा कोणताच मार्ग उपलब्ध नाही ही आनंदाचीच बाब म्हणावी लागेल. स्थानिक स्वराज्य संस्थांकडे कुत्र्यांच्या नियंत्रणाची जबाबदारी कायद्याने आहे. त्यासाठी सरकार निधी देते. दशक-दशक निधी संपत नाही. मात्र, कंत्राटदारांचे पोट त्यावर चालते. एका वस्तीतले कुत्रे पकडायचे आणि दुसऱ्या वस्तीत नेऊन सोडायचे. एक कुत्रा पकडण्याचे पाचशे ते हजार रुपये. कुत्रा किंवा कुत्रीच्या नसबंदीचीही सोय आहे म्हणतात. पण, कोणती नस कुठे दबते कुणास ठावूक, कुत्री वाढतच असतात. कुत्रे वाढत राहतील तर कंत्राटदारांचे पोट चालत राहील हा साधा तर्क असावा. कुत्र्यांच्या जिवावर कंत्राटदार गब्बर झाले आहेत. एरवीही सारा देश गब्बर कंत्राटदारांच्या भरवशावर चालत असेल तर येथेही सरकारचा इलाज नाही, हे आपण समजून घेतले पाहिजे. जे सरकार कुत्रे पकडू शकत नसेल, ते बिबट्याला कसे पकडणार, असे राष्ट्रवादीचे जयंत पाटील गमतीत म्हणाले. ते विरोधात असल्यामुळे असे बोलणारच. विरोधकांना गांभीर्याने थोडेच घ्यायचे असते! सरकार चालवायचे असेल तर गांभीर्याने घेण्याचे विषयच वेगळे असतात. शेतकरी मरत असतात, तसे कुत्रे चावतच असतात. सामान्यांनी समजून घ्यायचे असते की, सरकारचे नाईलाज सरकारएवढेच मोठे असतात. त्यात कुत्र्या-बित्र्यांच्या भानगडी सामान्यांनी पाहायच्या असतात. हा विषय सरकारच्या कक्षेत येत नाही, अशी घोषणा केली जाणार नाही हे नक्की. कारण कायद्याची अडचण आहे. कायदा असला तरी त्याची अंमलबजावणी जशी पूर्वीच्या सरकारांनी केली नाही, तसे हेही सरकार करणार नाही. ज्याला जगायचे असेल त्याने एक तर घरात राहावे किंवा कारने फिरावे. नाही तरी समृद्धी वाढत चालली आहे. त्यामुळे कारची संख्या वाढली पाहिजे. कुत्र्यांच्या भीतीने का होईना, ऑटोमोबाईल उद्योगाला अधिकचे अच्छे दिन येतील, ही त्यामागची दूरदृष्टी असावी. कुत्र्यांची संख्या कमी केली तर माणसांची चपळता नाहीशी होऊन राज्याची उत्पादकता कमी होईल, अशी भीतीही सरकारला आहेच. अशावेळी कैचीत सापडलेल्या सरकारने काय करायचे?... भटके कुत्रे कमी करून राज्याचा जीडीपी कमी करायचा, की त्यांची संख्या वाढती राहावी यासाठी निष्काम कर्मयोगी बनून जीडीपीत भर घालायची?... प्रश्न साधा आहे, पण उत्तर साधे नाही. त्यामुळे आपण एवढेच समजून घ्यायचे की, आपण कुत्र्याच्या मौतीनं मेलो तरी आपल्याला कुत्रं विचारणार नाही हे गृहीत धरतो ना? मग सरकारसारख्या एवढ्या मोठ्या व अत्यंत महत्त्वाची कामे असलेल्या यंत्रणेकडून काय अपेक्षा करताय?


## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# धुरंधर आणि राजकीय इच्छाशक्ती

आदित्य धर दिग्दर्शित 'धुरंधर' या चित्रपटाची चर्चा सगळीकडे सुरू आहे. या चित्रपटाने चांगली कमाई केलीच आहे, पण कमाईपेक्षाही याची चर्चा अधिक झाली आहे. प्रशंसकांनी स्तुतिसुमनांच्या माळाच्या माळाच निर्मिण्याचा ध्यास घेतला आहे आणि टीकाकारांनी दूषणे देण्याकरिता वापरण्यात येणाऱ्या गलिच्छ शब्दांचा साठा मोकळा केला आहे. क्वचितच इतके यश एखाद्या चित्रपटाला लाभते. बऱ्याचदा चर्चा होऊनही चित्रपट चांगली कमाई करत नाही. तर कमाई करूनही प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवण्यास अपयशी ठरतो. मात्र धुरंधरने या सगळ्या बेड्या मोडलेल्या आहेत. चित्रपट गुप्तहेरावर आधारित असला तरी त्याचा जॉनर हा स्पाय थ्रिलर नसून क्राईम थ्रिलर आहे. पाकिस्तानातील गँगवॉरचा संबंध गुप्तहेराशी लावण्यात दिग्दर्शकाला यश आले आहे आणि तेथील गुंडांचा विक्षिप्त, विद्रूप, हिडिस आणि मानवतेला शाप ठरणारा चेहरा दाखवण्यातही त्याला यश लाभले आहे. १९९९ रोजीचा आयसी-८१४ प्लेन हायजॅक, २००१ चा संसद हल्ला, २००८ मधील २६/११ हल्ला या तीन महत्त्वाच्या घटना चित्रपटांत येतात. २६/११ या प्रसंग तर थोडासा डॉम्युमेंटरी शैलीत घेण्याचा प्रयत्न झाला आहे. आदित्य धर हा 'उरी-द सर्जिकल स्ट्राईक' या चित्रपटाचा दिग्दर्शक आहे आणि दिग्दर्शक म्हणून 'धुरंधर' हा त्याचा दुसरा चित्रपट. 'बारामुल्ला' या नुकत्याच गाजलेल्या चित्रपटाचा तो पटकथालेखक आणि निर्माताही आहे. त्यामुळे देशभक्ती हा त्याच्या एकंदर चित्रपटांचा सूर दिसतो. मात्र देशभक्ती दाखवताना तो उजवा किंवा डावा असा भेद करत नाही. धुरंधरच्या बाबतीत बोलायचं झालं तर आदित्य धरला जे अपेक्षित असेल ते असेल मात्र त्यातून राजकीय इच्छाशक्तीचा कमकुवतपणा सपशेल दिसतो. स्वयंघोषित बळजबरीचे पुरोगामी आणि नक्षली प्रवृत्तीच्या लोकांना ठसका लागून त्यांचा जीव बेहाल होतोय त्यामागे हे महत्त्वाचे कारण आहे. डॉ. मनमोहन सिंग २००४ ते २०१४ या काळात देशाचे पंतप्रधान होते. म्हणजे २६/११ हल्ल्यावेळी डॉ. मनमोहन सिंग तर प्लेन हायजॅक आणि संसद हल्ल्यावेळी वाजपेयी पंतप्रधान होते. तरी सुद्धा चित्रपट पाहताना पुरोगाम्यांना इतका त्रास का झाला असावा? याचं उत्तर जाणून घ्यायचं असेल तर पुरोगामी विश्व आपल्याला समजून घ्यावं लागेल.

पुरोगामित्वाची चळवळ भारतामध्ये ब्रिटिश काळात सुरू झाली. तरी त्याही आधीपासून भारतात वेगवेगळी मते अस्तित्वात होती. बुद्धकाळाच्या सुमारे ५०० वर्षांपूर्वीही वेगळी मते मांडली जात होती. मात्र स्वातंत्र्यानंतर पुरोगामी चळवळीने विद्रूप रूप धारण केले. हिंदू विरोध हा या चळवळीचा केंद्रबिंदू झाला होता. त्यामुळे या चळवळीतील वैचारिक अधिष्ठान नाहीसे झाले. ही पुरोगामी चळवळ कशासाठी आहे याचा विसर पडून किंबहुना विसर पडावा याच हेतूने पुढे ही चळवळ सुरू राहिली. हिंदू विरोध करण्यासाठी त्यांना ब्राह्मण विरोध करणे क्रमप्राप्त होते. कारण विरोध, बंड हे बऱ्याचदा प्रस्थापित विरुद्ध विस्थापित असे होते. भारतातील प्रस्थापित म्हणजेच सवर्ण व ब्राह्मण या सवर्णांचे प्रतीक. हिंदू हा ब्राह्मणांचा धर्म आहे असे सांगून हिंदू धर्मावर तसेच हिंदुत्व या राजकीय सैद्धांतिक विचारावर घाला घालण्याचा




प्रयत्न आजही होत आहे. सध्या या पुरोगाम्यांना हिंदू धर्म यापेक्षा हिंदुत्व हा अस्सल पुरोगामी विचारांनी नटलेला सिद्धांत अधिक धोकादायक वाटतो. कारण या विचारात असीम देशभक्तीची, देशासाठी वाट्टेल तो त्याग करण्याची, स्वतःच्या देहाची समिधा या देश-यज्ञात अर्पण करण्याची प्रेरणा आहे. हिंदुत्वाची व्याख्या अनेकांनी केलेली आहे. मात्र सावरकरांनी केलेली व्याख्या खूप गाजली. समर्थकच नव्हे तर विरोधकांनीही ही व्याख्या टीका म्हणून का होईना, पण डोक्यावर घेतली आणि पुरोगाम्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांनंतर आधुनिक भारतातले सावरकर हे हिंदूंचे प्रमुख नेते असल्याचे मान्यही केले. म्हणूनच जिन्ना सुभाषबाबूंना हिंदूंचे नेते म्हणून सावरकरांची भेट घ्यायला सांगतात. आजही राहुल गांधी सावरकरांवर गलिच्छ आरोप करतात ते याच कारणासाठी. राहुल गांधी हे स्वत:ला या पुरोगामी विश्वाचा नेता मानतात आणि सावरकर हे त्यांचे प्रमुख विरोधक आहेत. आता या पुरोगामी विश्वाने केवळ हिंदू विरोध इतकेच ध्येय न ठेवता हिंदू विरोध करण्यासाठी देश विरोध हाही हेतू सर्वोच्च मानत आहेत. तुम्ही जर यांची विधाने, यांच्या कृती, यांची मते बारकाईने लक्षात घेतली तर तुम्हाला कळेल की या जयचंदाची औलादी आहेत. यांनी तर आता रँडला मारणाऱ्या देशभक्त चापेकर बंधूंना व्हिलन ठरवण्याचा आणि रँडला हीरो ठरवण्याचाही बेत आखलेला आहे. हे स्लो पॉयजन ते कदाचित इंग्रजांचे हस्तकच असल्याने देत असावेत. हे जिहादी अतिरेकी व नक्षलींचे शुभचिंतक आहेत. भारतातले जे मूळ आहे, ते भारताचे शत्रू आहे, असा नॅरेटिव्ह हे लोक पसरवत आहेत. जेव्हा जेव्हा अतिरेकी हल्ला होतो तेव्हा हे भारतातल्या सरकारला दोष देतात (अर्थात असे हल्ले हे सरकारचे अपयश असतेच.) पण ज्यांनी हल्ला केला त्या जिहादी अतिरेक्यांविषयी यांच्या मनात प्रचंड आदर आणि प्रेमभाव असतो. पहलगाम हल्ला झाला तेव्हा अतिरेक्यांची बाजू मांडण्यासाठी हे पुरोगामी लोक जिवाच्या आकांताने धावत आले. ही पुरोगामी विचारधारा मूळच्या पुरोगामी या शब्दाला बाधक आहे. कारण मूळ पुरोगामी चळवळ या देशद्रोह्यांनी काबीज केली आहे. ही देशद्रोही मानसिकता अनेक काळापासून देशात अस्तित्वात आहे. आपल्याकडे अनेक आक्रमक आलेत. त्या आक्रमकांना या देशद्रोह्यांनी मदत केली आहे. हिंदूंना किंवा मूलवासीयांना विरोध करण्यासाठी आणि त्यांच्यावर सत्ता मिळवण्यासाठी या लोकांनी परकीय शक्तींना आश्रय दिला. आजही टूलकिट गँगच्या माध्यमातून ही गोष्ट सहज सिद्ध करता येते. सीएए आणि एनआरसीच्या विरोधात झालेल्या दंगलीला कोणी पाठिंबा दिला हे तुम्हा सर्वांना माहीतच आहे. प्रदूषणविरोधी आंदोलनात निर्दयी, खुनी माओवादी माडवी हिडमाचे गुणगान का? या प्रश्नाचे उत्तर फार कठीण नाही. रामाला विरोध आणि बाबरला समर्थन का? अफलझलखानाचे लांगूलचालन का? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे देण्याची गरज आहे काय?

धुरंधर या चित्रपटाला जो विरोध होतोय, त्याची ही पृष्ठभूमी आहे. लेखाची मर्यादा म्हणून मी फार विस्तृत स्वरूपात इथे मांडू शकत नाही. यासाठी मी वाचकांची क्षमा मागतो. मात्र आपल्याला परिस्थितीचे गांभीर्य लक्षात आले असेल अशी आशा बाळगतो. मी वर म्हटल्याप्रमाणे धुरंधर भारतातील कोणत्याच जमातीवर लक्ष्य करत नाही. उलट तो पाकिस्तानचा गलिच्छ चेहरा उघड करतो. यामुळे पाकिस्तानी नागरिकांना त्रास होतोय, हे आपण समजू शकतो. पण पुरोगाम्यांना का त्रास होतोय? याचं उत्तर म्हणजे उपरोक्त स्पष्टीकरण आहे. धुरंधरच्या निमित्ताने राजकीय इच्छाशक्ती काय असते हे आपल्याला कळतं. पाकिस्तानी गँगस्टर कशाप्रकारे बनावट भारतीय चलनी नोटांचा व्यापार करायचे हे कळतं आणि म्हणूनच नोटबंदी का आवश्यक होती हेही कळतं. ल्यारी या पाकमधील शहरातील गँग्स आणि उत्तर भारतातील गँग्स यांचा उल्लेख चित्रपटात येतो. आज या गँगस्टर्सवर कशाप्रकारे नियंत्रण मिळवण्यात यूपी शासन यशस्वी झाले आहे हेही लक्षात येते. काश्मीर हा भारताचा भाग नाही असे उघडपणे बोलणारे काश्मिरी आणि आता दबक्या आवाजातही बोलण्यास घाबरणारे काश्मिरी यांतील भेद आपल्याला कळतो. त्यामुळे राजकीय इच्छाशक्ती फार महत्त्वाची आहे. इतक्या वर्षांत निर्माण केलेली घाण एक कांडी फिरवून जादूने स्वच्छ होणार नाही. कदाचित घाण निर्माण करण्यात जितकी वर्षे खर्च झाली, किमान तितकी वर्षे तरी घाण साफ करायला लागतील. पण घाण साफ झाली पाहिजे ही राजकीय इच्छाशक्ती तर हवीच ना? धुरंधर सुप्तपणे या राजकीय इच्छाशक्तीवर भाष्य करतो. पुरोगाम्यांना दुःख होण्याचे हे महत्त्वाचे कारण आहे. कारण राजकीय इच्छाशक्ती म्हणजेच पुरोगामित्वाचा बुरखा पांघरलेल्या या माफियांचा, गुंडांचा, राक्षसांचा, देशद्रोह्यांचा अंत!

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**विजय कुळकर्णी**

# आजारापेक्षा उपचार भारी ठरू नये!

आजारापेक्षा उपचार भारी ठरू नये, असे म्हणण्याची स्थिती एस. टी. महामंडळांच्या राज्यातील विविध आगारांवर आली आहे. राज्य परिवहन महामंडळाला तोट्यातून बाहेर काढण्यासाठी सरकारचे प्रयत्न सुरू आहेत. त्याचाच एक भाग म्हणून एस. टी. महामंडळाच्या ताफ्यात इलेक्ट्रिक बसेस दाखल झाल्या आहेत. या बसेस आगारांसाठी खर्चीक ठरत आहेत. शिवाई ही ई-बस महामंडळाच्या ताफ्यात दाखल होत आहे. आजपर्यंत ५५० पेक्षा जास्त बसेस राज्यातील विविध आगारांत पोहोचल्या आहेत. या बसचे ७४ रु. प्रतिकिलोमीटर या आगारांना भरावे लागणार आहेत. या बसेस लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी धावणार आहेत. एकदा चार्ज केल्यावर ३०० कि. मी. ही बस धावणार आहे. त्यामुळे इंधनावर डिझेलच्या तुलनेत या बसचा खर्च लक्षणीयरीत्या कमी होणार आहे. सर्व्हिसिंगचा खर्च देखील कमी होणार आहे. त्यामुळे आर्थिक बचत होणार असल्याचे सांगितले जात आहे. एका बसला पूर्ण चार्जिंगसाठी किमान ३ तास लागणार आहेत. सध्या बुलढाणा जिल्ह्यातील सात पैकी ४ आगारांना टप्प्याटप्प्याने १५० ई-बसेस मिळणार आहेत. मात्र, या बसचे प्रवासी भाडे वर्तमान बसेसपेक्षा जास्त असल्याने ते प्रवाशांना परवडणारे नसल्याचे प्रवाशांचे म्हणणे आहे. सध्या खामगाव-अकोला धावणाऱ्या लालपरीचे तिकीट ९१ रु. आहे. तर ४४ आसनी शिवाई ई-बसचे तिकीट १४४ रु. व ३५ आसनी ई-बसचे तिकीट १३१ रु. आहे. त्यामुळे सर्वसामान्य प्रवासी या बसने प्रवास करणे टाळत आहेत. परिणामी एस. टी. आगारांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. त्यामुळे अनेक आगारप्रमुखांनी या बसेस घेण्यास नापसंती दर्शविण्याचा प्रयत्न केला. पण, महामंडळाचा निर्णय असल्याने त्यांना या बसेस आगारात दाखल करून घ्याव्या लागल्या किंवा लागत आहेत. तसेच, बुलढाणा जिल्ह्याचा विचार करता ई-बस चार्जिंगसाठी आवश्यक सुविधा नाही. एका खाजगी कंपनीला बुलढाणा, चिखली, मलकापूर, खामगाव आणि शेगाव येथील आगारांमध्ये चार्जिंग सेंटर उभारण्याचे कंत्राट देण्यात आले असल्याची माहिती आहे. बुलढाणा व खामगाव येथील काम अंतिम टप्प्यात असल्याचे सांगण्यात येते. मात्र, ही सुविधा अजून कार्यान्वित न झाल्याने ई-बस सेवा सुरू होण्यास आणखी विलंब लागणार आहे.

ई-बस सेवेतील इतर अनेक तांत्रिक अडचणींसोबतच प्रवास भाडे ही देखील महत्त्वाची समस्या आहे. सर्वसामान्य प्रवाशांना परवडेल, एवढे भाडे आकारण्यात यावे, अशी प्रवाशांची मागणी आहे. कारण, साध्या बसने प्रवाशांना सवलतीच्या दरातील प्रवास भाड्याचा देखील लाभ मिळतो. महिलांना अर्धे तिकीट आकारले जाते. ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास सवलतीला लाभ मिळतो. याशिवाय दिव्यांग व इतर प्रवास सवलतधारकांना या बसने प्रवास करता येईल की नाही, ते अजून निश्चित नाही. सरकारने प्रवास सवलत दिल्यामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक प्रवाशांची संख्या लक्षणीयरीत्या वाढली आहे. प्रवासी घेण्यासाठी सध्या सुरू असलेल्या बसेसची संख्या कमी पडत आहे. त्यातही नादुरुस्त बसेसची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. ई-बसेस लवकरात लवकर सुरू झाल्यास जुन्या बसेसवरील ताण कमी होईल. तसेच, ई-बसेसच्या प्रवास भाड्यात काही कपात केल्यास सर्वसामान्य प्रवासी त्या बसेसने प्रवास करण्यास नक्कीच पसंती देतील. यापूर्वी महामंडळाने शिवशाही ही बससेवा सुरू केली होती. या बसचे तिकीटही सुरुवातीला जास्त होते. प्रवाशांना कोणतीही सवलत या बसमध्ये मिळत नव्हती. त्यामुळे सुरुवातीला या बससेवेला कमी प्रतिसाद मिळाला. मात्र, प्रवास भाडे कमी केल्यावर शिवशाहीने देखील प्रवास करण्यास प्रवाशांनी पसंती दिली. वातानुकूलित प्रवासाचा आनंद प्रवाशांना मिळाला आणि मिळत आहे. तसेच, शिवाई या ई-बस सेवेचे देखील आहे. या बसचे प्रवासी भाडे कमी करून राज्य परिवहन महामंडळाने प्रवाशांना दिलासा द्यावा. तसेच, राज्यातील सर्व आगारांत ई-बसेस व चार्जिंग स्थानकांची उभारणी लवकरात लवकर करावी, अशी अपेक्षा यानिमित्ताने व्यक्त कराविशी वाटते.

८८०६००६१४९


## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# विरोधक आहेत कुठे?

संविधान खतरे में, लोकतंत्र खतरे में, अशी आरोळी ठोकून विरोधकांनी लोकसभा निवडणुकीच्यावेळी नॅरेटिव्ह निर्माण केला. संविधान हातात घेऊन सातत्यानं घोषणा देणारे, आरडाओरडा करणारे, विरोधक संसदीय लोकशाहीतल्या सगळ्यात महत्त्वाची ठिकाणं प्रतिनिधी मंडळात अर्थात विधानसभा, लोकसभा या दोन्ही ठिकाणी काय करत आहेत? जनतेचे प्रश्न मांडायचे सोडून, पैसा, खोके, अदाणी-अंबानी करताना दिसतात. महाराष्ट्राचेच घ्यायचे झालेच तर, येथील विरोधक केवळ विरोधी पक्षनेतेपद कधी आणि कसे मिळेल या एकमेव चिंतेत दिसत आहेत. बाकी जनतेच्या प्रश्नांना वाचा कोण फोडणार? विरोधक आहेत कुठे?, असा प्रश्न आता निर्माण झाला आहे.

विधिमंडळाचे अधिवेशन सुरू होऊन आता जवळजवळ आठवडाच लोटला आहे. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला विरोधकांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेपासून तर, या सहा दिवसांत विरोधकांच्या अजेंड्यावर एकमेव विरोधी पक्षनेता निवडीचा विषय राहिल्याचे दिसले. विरोधी पक्षनेता पद मिळेल की नाही या गोष्टीत विरोधी पक्ष अडकलेला, गुरफटलेला दिसला. ते वैधानिक पद आहे, त्याला एक दर्जा आहे, विशेषाधिकार आहेत हे जितकं खरं आहे, तितकंच हे देखील खरं आहे की, सभागृहातील साध्या सदस्यालाही आपल्या कुठल्याही अन्य बाकड्यावर बसून महत्त्वाचे विषय तेवढ्याच तीव्रतेने मांडता येऊ शकतात. आणि यासाठी संख्या कमी आहे हे देखील काही कारण नाही. मुळात जनतेविषयची आस्था, जनतेच्या प्रश्नांविषयी कळकळ असली पाहिजे. त्यांच्यासाठी लढून न्याय देण्याची लढाऊवृत्ती असली पाहिजे. आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे संविधान आणि लोकशाहीबद्दल वचनबद्धता असली पाहिजे. असं असलं तर, मग मला काय? मिळेल, माझं काय? या गोष्टीत माणूस अडकत नसतो. मात्र, यावेळी विरोधकांची संविधान असोत किंवा मग संसदीय लोकशाही याच्याबाबतीत वचनबद्धता असल्याचे कुठेही दिसत नाही. केवळ विरोधी पक्षनेतापदात जीव अडकून बसला आहे. आणि हा का अडकून बसला आहे तर, विरोधी पक्षनेता हे पद अप्रत्यक्षपणे सत्तापद आहे. या पदाला कॅबिनेट मंत्र्याचा दर्जा असतो, कार्यालय, स्टाफ, गाडीघोडा, राहायला बंगला, सर्व सुविधा, सगळा शासकीय खर्च असा प्रोटोकॉल मिळतो. यासाठी विरोधकांची सगळी चढाओढ चालली आहे.



बरं सुरुवातीला ही नियुक्ती कोणी अडवून धरली. तर, विरोधकांनी स्वत:... काँग्रेस आणि उबाठा दोघेही विधान परिषदेच्या विरोधी पक्षनेतेपदावर दावा ठोकून बसले आणि यांचे एकमत होत नव्हतं. उद्धव ठाकरेंनी विधानसभेत संख्या आमची जास्त असल्यानं ते पद आमचं असा दावा ठोकला होता. तर, मावळता विरोधी पक्षनेता आमचाच असल्यानं विधान परिषदेतही आमचाच पहिला हक्क असल्याची भूमिका घेऊन महाविकास आघाडीत सुरुवातीला गोंधळ उडवून दिला होता. उद्धव ठाकरेंच्या या निर्णयामुळे काँग्रेस सजग झाली आणि त्यांनी वेगळी भूमिका घेत विधान परिषदेचा विरोधी पक्षनेता संख्याबळानुसार आम्हाला द्या आणि विधानसभेचा तुम्ही घ्या असा प्रस्ताव दिला. या तिढ्यात तोडगा निघेपर्यंत वर्षभर तर विरोधकांनी विरोधी पक्षनेतेपदावर दावाच केला नव्हता. ते आपल्याच तंगड्या एकमेकांच्यात अडकवून बसले राहिलेत. त्यानंतर मग जेव्हा सामोपचाराची भूमिका घेत, विधानसभा उबाठाला आणि विधान परिषद काँग्रेसला असा तोडगा निघाला तोपर्यंत उशीर झाला होता. आणि विधानसभा अध्यक्ष, विधान परिषद सभापतींसमोर १० टक्के संख्याबळाचा प्रश्न उपस्थित झाला. आता सरकार सत्तापद देत नाही, म्हणून मग तुम्ही विरोधी पक्षाचं कामच करणार नाही का? मुळात सरकारने पद दिलं किंवा नाही दिलं तरी जनतेने तुम्हाला विरोधी पक्ष म्हणून जनादेश दिला आहे ना... मग त्या जनादेशाचा आदर करत जनतेचे प्रश्न सभागृहात जोरकसपणे मांडणे, सरकारला धारेवर धरून ते सोडवणे आणि जनतेला न्याय मिळवून देणे, हे विरोधी पक्षाचे कर्तव्य तर पार पाडलं पाहिजे विरोधकांनी. मात्र, सत्ता, गाडी, बंगला, पदाच्या लालसेत यांचे सर्रास दुर्लक्ष झाले आहे.

नागपूर अधिवेशन केवळ एकाच आठवड्याचं म्हणून डांगोरा पिटला. कालावधी वाढवून देण्याची स्टंटबाजी केली. यांचे नेते उद्धव ठाकरे या आठवड्याच्याच अधिवेशनाला पूर्णवेळ उपस्थित राहिले नाही. याच उद्धव ठाकरेंनी २९ जून २०२२ ला मुख्यमंत्रिपदाच्या आणि विधान परिषदेत सदस्यत्वाच्या राजीनाम्याची घोषणा केली होती. पण विधान परिषद सदस्यपदाचा राजीनामा मात्र त्यांनी अजूनही दिला नाही. बरं दिला नाही तर नाही, पण आमदार म्हणून तरी उद्धव ठाकरेंनी काम केलं का? तर तेसुद्धा केलं नाही आणि करतदेखील नाहीत. ते सभागृहातच अमावास्या-पौर्णिमेला उगवतात. कुठल्याही कामकाजात त्यांचा भाग नाही. एक प्रश्न उपस्थित केला नाही. सभागृहात कोणत्याही प्रश्नावर सरकारला धारेवर धरलं नाही. मग यांना सभागृहातच उपस्थित रहायचं नसेल तर, कालावधी वाढवून पाहिजे तरी कशाला? बरं ठाकरे स्वत: मुख्यमंत्री असतानादेखील एकदा विधिमंडळात आले. आणि शरद पवारांच्या मतानुसार दोन वेळा मंत्रालयात आले. ही आहे का यांची लोकशाहीप्रतीची आस्था आणि वचनबद्धता? उलट यातून असं प्रतीत होतं की, संसदीय व्यवस्थेबद्दल यांच्या मनात तुच्छता आहे. संवैधानिक संस्थांबद्दल आम्हाला काडीचाही आदर नाही असा या वर्तनाचा भाव होतो. मुळात लोकशाहीच्या मंदिराकडे दुर्लक्ष करणं, उपस्थित न राहणं, त्याची उपेक्षा करणं, हा तसं पाहिलं तर ठाकरेंचा अहंकारच म्हणावा लागेल. एकूणच परिस्थितीचा विचार केला तर, निवडणुका आल्या की, संविधान, लोकशाही बचावच्या यांच्या आरोळ्या या निव्वळ ढोंग असल्याचं यांच्या कृतीमुळे आता सिद्ध झालं आहे. जर लोकशाहीबद्दल एवढी कळकळ आहे तर, लोकशाही व्यवस्था मानायला काय अडचण आहे? मुळात विरोधी पक्षनेतेपद हे जनतेचे प्रश्न जोरकसपणे मांडण्यासाठी पाहिजे आहे, असे काही विरोधकांच्या कृतीतून दिसत नाही.

९२७०३३३८८६

## आजचे संघगीत-७१

शनिवार, १३ डिसेंबर २०२५

### मन माझे विसावले रे संघमंदिरी स्थिरावले

मन माझे विसावले रे संघमंदिरी स्थिरावले ॥धृ.॥

किती भटकलो रानोमाळी एकलाच मी सांजसकाळी
भोंवतालचे भान नच मुळी ध्येयशून्य जीवित थकले रे ॥१॥

तोच कुठुनसा ये आर्त स्वर वीणा छे, ना सतार नच तर
सनई न मुरली पार्थिव नच स्वर स्वर्गीय गीत मज गमले रे ॥२॥

हे ताऱ्यांचे निगूढ गूंजन जळत्या ज्योतीचे संवेदन
फुटत्या लाटांचे प्रस्फुंदन हृद्भाव सर्व हे अवतरले रे ॥३॥

प्रौढांचे समतोल समीक्षण तरुणांचे दाहक कर्तेपण
बालांचे ते विभूतिपूजन छेडिता तंतु हे स्वर घुमले रे ॥४॥

येथ सुरांची नसे सजावट लटक्या शब्दांची नच वटवट
दांभिकतेची तात्त्विक लटपट बोलते हृदय हे जळते रे ॥५॥

आयुष्याचे गीतच गमले त्यागाच्या रागात गाइले
कर्तव्याचे सूरच सगळे गंभीर उरी वरवर हसले रे ॥६॥

हळू हळू हृदयांत प्रगटली अनंत रूपे गीतामधली
हृदयाहृदयी एकच झाली ते गीतच जीवन बनले रे ॥७॥

## संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश काळाची गरज

नुकताच २६ नोव्हेंबरला संपूर्ण देशात संविधानाचा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला. अमृत महोत्सवी संविधान दिनानिमित्त संपूर्ण देशात संविधानाचा जागर करण्यात आला. ठिकठिकाणी विविध उपक्रमांद्वारे संविधानाचे महत्त्व अधोरेखित करणारे कार्यक्रम, उपक्रम राबवण्यात आले. मात्र संविधान दिन हा फक्त एक दिवसाचा सोहळा ठरता कामा नये. वास्तविक संपूर्ण वर्षभर संविधानाचा जागर व्हायला हवा. संविधान लागू होऊन आज ७६ वर्षे उलटली तरी नागरिकांना आपले हक्क आणि अधिकार माहीत नाहीत म्हणूनच संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश करण्याची वेळ आली आहे. संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश करावा ही खूप जुनी मागणी आहे. मात्र त्याला अद्याप म्हणावा तसा प्रतिसाद मिळत नाही. आज आपल्या देशात लाखो विद्यार्थी पदवीधर होतात पण आपल्या संविधानाचा अभ्यास अतिशय कमी विद्यार्थ्यांना असतो. उच्चशिक्षित असूनही संविधानाची जुजबी माहितीही विद्यार्थ्यांना नसते. संविधानाबाबत उच्चशिक्षित विद्यार्थी अज्ञानीच असतात. त्यांचे हे अज्ञान दूर होण्यासाठी संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश होणे गरजेचे आहे. भारतीय संविधानात नागरिकांचे मूलभूत हक्क, कर्तव्य, अधिकार यांचा समावेश आहेच पण देशाचा आदर्श कारभार कसा करावा याचेही नियम आहेत. समता, बंधुता यांचीही शिकवण संविधानात आहे. संविधानामुळेच देश अखंड आहे. तो लोकशाहीचा पाया आहे. आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे. संविधान आपला राष्ट्रीय ग्रंथ आहे. भारताचे संविधान शालेय स्तरावरच विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवले तर राज्याच्या आणि राष्ट्राच्या उभारणीत ते योग्य दिशेने आपापल्या क्षेत्रात कार्य करू शकतील म्हणूनच हा विषय अभ्यासक्रमात समाविष्ट होणे ही काळाची गरज आहे.

## वाचक पत्रे

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

### ईपीएस ९५ च्या पेन्शनर्सना न्याय द्या

आपल्या देशात २०१४ ला सर्व जनतेच्या मनातलं सरकार म्हणजेच मोदी सरकार स्थापन झाले. तेव्हापासून आजपर्यंत १ कोटीच्या वर ईपीएस ९५ चे पेन्शनर्स एका चांगल्या निर्णयाची वाट बघत आहेत. कमीत कमी १००० रुपये पेन्शनमध्ये वाढ होऊन ५००० रुपये व्हावी आणि त्यावर महागाई भत्ता मिळावा इतकी साधी आणि छोटी मागणी सरकारकडे पेन्शनर्स करत आहेत. पंतप्रधान मोदी यांच्याकडून ही अपेक्षा आहे. पंतप्रधान मोदी यांनी अनेक कल्याणकारी योजना आणल्यात. जनतेच्या भल्यासाठी अनेक कामे केलीत. आयुष्मान योजना, पंतप्रधान आवास योजना, या सर्व योजना केवळ मोदी सरकारच आणू शकतात आणि राबवू शकतात. या आधीच्या सरकारकडून कधीच अपेक्षा केली नव्हती कारण ती पूर्ण होणार नव्हतीच. परंतु मोदी सरकार हे प्रधान सेवक आहेत. जनतेच्या मागण्यांचा जवळून अभ्यास आहे. त्यामुळे या सरकारकडून ईपीएस पेन्शनधारकांना अपेक्षा आहेत. कारण सध्या अतिशय हलाखीचे जीवन पेन्शनर्स जगत आहेत. आता नुकतेच संसदेच्या अधिवेशनात या विषयावर प्रश्नोत्तरे झालीत. उत्तर देताना सरकारने ईपीएस पेन्शन फंडामध्ये निधीची कमतरता असल्यामुळे सध्या पेन्शनमध्ये वाढ होणार नाही हे स्पष्ट केले त्यामुळे इतक्या वर्षांपासून आतुरतेने वाट बघत जीवन जगत असणारा वर्ग निराश झाला. आता कोणाकडे न्याय मागावा हा प्रश्न त्यांना भेडसावत आहे. केंद्रातले सरकार हे गोरगरिबांचे, वंचितांचे सरकार म्हणून काम करत आहे आणि तसा लौकिकही आहे. त्याप्रमाणे सर्व पेन्शनधारकांची विनंती आहे की परत एकदा या प्रश्नाचा गांभीर्याने विचार करून त्यांना योग्य न्याय द्यावा.

**सुनील बोक्षे**/७५८८१७७४६२

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समूह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)


**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, धाराशिव,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# तुळजाईनगरीला अद्ययावत नाट्यगृहाची गरज!

**लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाची उदासीनता ... स्थानिक कलावंताना हक्काचं व्यासपीठ कधी मिळणार?...**





**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ डिसेंबर -**

मराठवाडा तसा दुष्काळवाडा म्हणून राज्यभर ओळखला जातो,धाराशिव म्हणजे तर देशात आकांक्षीत जिल्ह्याच्या रांगेत तिसऱ्या क्रमांकावर नोंद घेण्यात आलेला जिल्हा पण यांच जिल्ह्यात महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपिठापैकी एक पूर्ण पीठ म्हणून परिचित असणारे कुलस्वामिनी आई श्री तुळजाभवानी मातेची नगरी...बालाघाटच्या डोंगर माथ्यावर निसर्गाच्या सानिध्यात वसलेलं सुंदर शहर म्हणून तुळजापूरला विशेष अशी ओळख असून आई श्री तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या हजारो भाविकांच्या गर्दीन दैनंदिन




गजबजलेलं गाव. येथील प्रसन्न वातावरणात कुणीही रमतं. याच तुळजाई नगरीत धार्मिक प्रथेला खूप मान असून कलानगरी म्हणून ही एक विशेष महत्वाची ओळख बनवली आहे ती येथील पारंपरिक सांस्कृतीक वारसा जपणाऱ्या आणि चालवणाऱ्या कलावंतानी.

तुळजापूर शहरात गेल्या अनेक दशकांपासून लोककला, भजन, भारुड, नाटक आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची समृद्ध परंपरा आहे. मात्र आजही शहरात आधुनिक ध्वनीप्रणाली, प्रकाशयोजना, सुसज्ज आसनव्यवस्था आणि प्रशस्त रंगमंच असलेले नाट्यगृह उपलब्ध नाही. स्थानिक कलाकार, रसिक मंडळी तसेच सांस्कृतिक संस्थांकडून शासनाने या मागणीला प्राधान्य देऊन तुळजापूरमध्ये सुसज्ज नाट्यगृह उभारण्याचा निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

श्रद्धा, इतिहास आणि सांस्कृतिक परंपरेसाठी ओळखल्या जाणाऱ्या तुळजापूर नगरीत शारदीय नवरात्र महोत्सवात राज्य शासनामार्फत आयोजित करण्यात आलेल्या महोत्सवामुळे शहरात सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी एक अद्ययावत नाट्यगृहाची आवश्यकता जाणवली. शहराची सांस्कृतिक परंपरा जपण्यासाठी आणि भविष्यातील कलावंत घडवण्यासाठी आधुनिक रंगमंच अत्यावश्यक असल्याचे स्थानिक कलावंतांचे मत आहे.

तुळजापूर तीर्थक्षेत्र विकास आराखडा २००३ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी मंजूर केला तत्कालीन आमदार मधुकरराव चव्हाण यांनी तुळजापूर शहर विकास आराखड्यात नाट्यगृहाचा समावेश केलेला होता. ते प्रस्तावित नाट्यगृहाची जागा बीएसएनएल टेलिफोन ऑफिस पाठीमागे आहे. परंतु हे काम या आराखड्यात होऊ शकले नाही. याशिवाय तुळजापुरात भाई उद्धवराव पाटील सांस्कृतिक सभागृह आमदार माणिकराव खपले यांच्या कार्यकाळात मलबा हॉस्पिटल समोर करण्यात आले होते. या जागेवर सांस्कृतिक सभागृह आणि नगरपरिषद वाचनालय अनेक वर्ष सुरू होते. त्यामुळे शहरातील सांस्कृतिक चळवळ चालत होती.

या सभागृहाचे पाडकाम नगरपरिषदेने करून तेथे उद्धवराव पाटील सभागृह बांधण्याच्या ऐवजी व्यापारी संकुल बांधण्याचा प्रस्ताव केला त्यामुळे शहरातील सांस्कृतिक चळवळच अडचणीत आली आज शहरांमध्ये कोठेही सार्वजनिक सांस्कृतिक सभागृह नसल्यामुळे कलाक्षेत्रात काम करणारे कलावंत विद्यार्थी यांना कलेचा अभ्यास सराव करणे कठीण झाले आहे.

तुळजापूरसारख्या सांस्कृतिक नगरीला आधुनिक नाट्यगृहाची तीव्र गरज आहे. यामुळे स्थानिक कलावंतांना सरावासाठी योग्य जागा मिळेल तसेच शहराची सांस्कृतिक ओळख अधिक मजबूत होईल. नाट्यगृह उभारल्यास श्री क्षेत्र तुळजापूरचे सांस्कृतिक महत्व अधिक उंचावणार असून

अद्ययावत, आधुनिक आणि सर्वसुविधांनी युक्त नाट्यगृह तुळजापूरमध्ये उभारले गेले तर केवळ सांस्कृतिक पायाभूत सुविधाच बळकट होणार नाहीत, तर श्री क्षेत्र तुळजापूरचे महत्व राज्यभरात आणि देशभरात अधिक वाढणार आहे.

### तुळजापूरात मोठ्या प्रमाणात रसिक वर्ग उपलब्ध

तुळजापूर हे केवळ तीर्थक्षेत्र नसून येथे मोठ्या प्रमाणावर जाणकार आणि उत्सुक असा रसिक वर्गही उपलब्ध आहे. धार्मिक कार्यक्रम, सांस्कृतिक मैफिली, लोकनाट्य, भारुड, कीर्तन आणि विविध कलात्मक सादरीकरणांना येथे नेहमीच उत्तम प्रतिसाद मिळत आला आहे. नवरात्र उत्सव, जत्रा आणि वर्षभर चालणाऱ्या धार्मिक उत्सवांच्या माध्यमातून शहरात कायम सांस्कृतिक वातावरण निर्मित होते.

### श्री क्षेत्र तुळजापूरची ओळख अधिक व्यापक...

धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक क्रियाकलापांचा संगम असलेला तुळजापूर एक धार्मिक सांस्कृतिक केंद्र म्हणून विकसित झाल्यास शहराला राज्यात आणि देशात वेगळी ओळख निर्माण करण्याची मोठी संधी आहे. नाट्यगृह हा त्या प्रक्रियेला गती देणारा महत्त्वाचा टप्पा ठरेल.

### तुळजापूरचे सांस्कृतिक आकर्षण वाढेल...

तुळजाभवानी मंदिरामुळे येथे वर्षभर भाविकांची मोठ्या प्रमाणावर ये-जा असते. जर त्याचबरोबर दर्जेदार नाट्यगृह उपलब्ध झाले तर शहरात सांस्कृतिक कार्यक्रमांची विविधता वाढेल, धार्मिक पर्यटनासोबत सांस्कृतिक पर्यटनालाही चालना मिळेल, तुळजापूरचे स्थान सांस्कृतिक केंद्र म्हणून अधिक मजबूत होईल.

### दर्जेदार व्यावसायिक नाट्यकलेचे सादरीकरण...

अद्ययावत नाट्यगृह असल्यास राज्यातील आणि देशातील व्यावसायिक नाट्यमंडळे तुळजापूरमध्ये येण्यास उत्सुक होतील. यामुळे क्लासिक नाटके, प्रयोगशील आणि आधुनिक निर्मितींचे सादरीकरण येथे होईल, स्थानिक प्रेक्षकांना मोठ्या शहरांमध्ये मिळणाऱ्या दर्जेदार कलेचा अनुभव गावातच मिळेल, तुळजापूरची सांस्कृतिक पातळी मोठ्या प्रमाणात उंचावेल.

### नाट्यगृहामुळे शहराची सांस्कृतिक प्रतिष्ठा वाढेल...

प्रसिद्ध दिग्दर्शक, निर्माते आणि कलाकार अशा ठिकाणी प्रयोग आयोजित करण्यास उत्सुक असतात जिथे प्रेक्षक प्रतिसाद चांगला, सुविधा उत्तम, शहराचे वातावरण सांस्कृतिकदृष्ट्या अनुकूल असते.

### प्रेक्षकांची मोठी संभाव्यता कलाकारांसाठी प्लस पॉइंट

तुळजापूरमध्ये धार्मिक पर्यटनामुळे प्रेक्षकांची संख्या मोठी आहे. नवरात्र महोत्सव किंवा विकेंड कार्यक्रमांमध्ये सभागृह हाऊसफुल होण्याची शक्यता जास्त असल्याने स्टार कलाकारांसाठी हे व्यावसायिकदृष्ट्या फायदेशीर ठरते. हीच गोष्ट त्यांना येथे शो करण्यास अधिक आकर्षित करते.

### स्थानिक कलाकारांना राज्यस्तरीय व्यासपीठ...

दर्जेदार व्यावसायिक नाटके तुळजापूरमध्ये येऊ लागली तर स्थानिक कलाकार त्यांच्याकडून शिकतील, नाट्यकलेचे तंत्र आत्मसात करतील, व्यावसायिक रंगभूमीकडे जाण्याची संधी शोधतील. यामुळे तुळजापूरमधून नवे, गुणवंत कलाकार घडू शकतील.

### आर्थिक आणि सामाजिक फायदा...

नाट्यप्रयोग, महोत्सव आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे शहरातील हॉटेल्स, लॉजिंग, लहान दुकाने, फूड कोर्ट यांना फायदा होत रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील. सांस्कृतिक आणि आर्थिक विकासाचे एकत्रित चित्र अधिक स्पष्ट होईल.

तुळजापूरचा समृद्ध नाट्यवारसा लक्षात घेता अद्ययावत ध्वनीप्रणाली, प्रकाशयोजना, आसनव्यवस्था आणि सरावासाठी योग्य सुविधा असलेले नाट्यगृह उभारले गेले तर नवोदित कलाकारांना व्यासपीठ मिळेल. तसेच व्यावसायिक नाट्यप्रयोगांचे आयोजन करता येऊन शहराची सांस्कृतिक ओळख अधिक मजबूत होईल.धार्मिक पर्यटनाबरोबरच सांस्कृतिक पर्यटनाची भर पडल्याने तुळजापूरची ओळख बहुआयामी बनेल.

तुळजापूरमध्ये दरवर्षी लाखो भाविकांचे आगमन होत असल्यामुळे येथे व्यावसायिक नाट्यप्रयोगांसाठी मोठी संधी उपलब्ध आहे. पण योग्य पायाभूत सुविधांच्या अभावामुळे अनेक नाट्यमंडळे तुळजापूरकडे वळत नाहीत. आधुनिक नाट्यगृह उभारले गेले तर नाट्यप्रयोग, संगीत मैफिली, सांस्कृतिक महोत्सव आणि साहित्यविषयक कार्यक्रमांना चालना मिळू शकते. त्यासोबतच स्थानिक अर्थव्यवस्थेलाही याचा फायदा होईल.

धार्मिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या महत्वाचे श्री क्षेत्र तुळजापूर, नवरात्र महोत्सवाच्या पुनरारंभानंतर नाट्यप्रेमी, कलाकार आणि रसिक वर्गामध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. काही वर्षांपासून बंद पडलेला महोत्सव जिल्हाधिकारी यांनी पुढाकार घेऊन राज्य सरकारकडे प्रस्ताव पाठवत पुन्हा सुरू झाल्याने शहरातील सांस्कृतिक उत्साह जोमाने वाढला असून, स्थानिकांनी अद्ययावत नाट्यगृहाची मागणी जोर धरत आहे.

अद्ययावत नाट्यगृह उभारल्यास तुळजापूरमध्ये केवळ नाट्यकलेचा विकास होणार नाही, तर श्री क्षेत्र तुळजापूरचे महत्व अनेक पटींनी वाढेल.

धार्मिक वैभवाबरोबरच उच्च दर्जाचे व्यावसायिक नाट्यप्रयोग, सांस्कृतिक कार्यक्रम आणि कलावंतांचे व्यासपीठ यामुळे तुळजापूरचे स्थान राज्यातील सांस्कृतिक नकाशावर अधिक ठळकपणे उमटेल.

नवोदित कलाकारांना रंगमंचावर काम करण्याची संधी मिळण्यासाठी प्रात्यक्षिक आणि व्यावहारिक वातावरण आवश्यक असते. 'शालेय महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपासून स्थानिक नाट्यसंस्था, हौशी कलाकार आणि व्यावसायिक नाट्यमंडळांपर्यंत सर्वांना या रंगमंचाची आवश्यकता जाणवत आहे. योग्य सुविधा असल्या तर तुळजापूरमधून अधिक सक्षम कलाकार घडण्याची संधी वाढेल, असा कलावंतांचा विश्वास आहे.

तुळजापूरमध्ये आधुनिक, सुसज्ज आणि उच्च क्षमतेचे नाट्यगृह उभारले गेले तर राज्यभरातील स्टार कलावंत आणि प्रसिद्ध नाट्यमंडळे तुळजापूरमध्ये येण्यासाठी नक्कीच उत्सुक राहतील, आजचे व्यावसायिक आणि सुपरहिट कलाकार तांत्रिक सुविधा, ध्वनीप्रणाली, प्रकाशयोजना आणि रंगमंच या सर्व बाबींना महत्त्व देतात. त्यामुळे दर्जेदार नाट्यगृह उपलब्ध झाल्यास तुळजापूर त्यांच्या प्रमुख टूर लोकेशनपैकी एक ठरेल.

तुळजापूर शहरातील विविध सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक संस्था आता नवीन सार्वजनिक नाट्यगृहाचा वापर करू शकणार आहेत. शहरातील सांस्कृतिक उपक्रमांना चालना मिळावी, सामाजिक संस्थांना कार्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी प्रशासनाने नाट्यगृहाची आवश्यकता नक्कीच आहे. नाट्यगृह निर्माणामुळे शहरातील दर्जेदार कार्यक्रम, नाट्यप्रयोग, सांस्कृतिक महोत्सव, व्याख्याने, तसेच विविध सामाजिक उपक्रमांना एक उत्तम व्यासपीठ उपलब्ध होईल.

तुळजापूर शहरासाठी नाट्यगृह उभारणीचे स्वप्न अजूनही प्रत्यक्षात उतरलेले नाही. नाट्यगृहासाठी जमिनीची अंतिम निवड, तांत्रिक अहवाल, निविदा प्रक्रिया आणि निधी वितरण या सर्वच बाबी अद्याप अपूर्ण असून मंजूर प्रकल्प कागदावरच का थांबलेला आहे.

या स्थितीला लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाची उदासीनता कारणीभूत असल्याची टीका नागरिक व स्थानिक कलावंतांकडून व्यक्त केली जात आहे.

## संक्षिप्त प्रतिक्रिया...

### तुळजापूर येथील नाट्यसंस्कृतीला न्याय द्यावा...



तीर्थक्षेत्र तुळजापूरला खूप मोठा सांस्कृतिक वारसा असून येथील नाटके व मेळे खूप प्रसिद्ध होते. तुळजापूर व परिसरामध्ये अनेक नाट्य कलावंत, कवी, शीघ्रकवी, वाद्य कलाकार मोठ्या प्रमाणात आहेत. त्यामुळे तत्कालीन मुख्यमंत्री स्वर्गीय विलासराव देशमुख यांनी तुळजापूर येथील सुसज्ज नाट्यगृहासाठी तुळजापूर श्री क्षेत्र विकास निधी अंतर्गत मान्यता दिली होती, परंतु आपुऱ्या जागेमुळे ते होऊ शकले नाही. त्यामुळे येथील नाट्यसंस्कृतीचा ऱ्हास होत आहे. तरी तुळजापूर येथे अध्ययवत सुसज्ज नाट्यगृहाचे आवश्यकता असून शासनाने तात्काळ प्राधान्य देऊन नाट्यगृह निधी मान्यता देत तुळजापूर येथील नाट्यसंस्कृतीला न्याय द्यावा.

- **मधुकरराव चव्हाण** (माजी परिवहनमंत्री)

### प्रसिद्ध कलाकार देवीच्या क्षेत्री कला सादरीकरणास उत्सुक...



तुळजाभवानी देवीचे तीर्थक्षेत्र असणाऱ्या तुळजापूर येथे कलावंत महिला पुरुषासाठी आणि विद्यार्थ्यांसाठी सांस्कृतिक सभागृह आणि नाट्यगृहाची आज नितांत गरज आहे. कलाकारांचा सराव करण्यासाठी सांस्कृतिक सभागृह असावे आणि व्यावसायिक नाट्य चळवळीसाठी अत्याधुनिक नाट्यगृह असावे. अनेक मोठे कलाकार देवीच्या स्थानी कला सादरीकरण करण्यासाठी उत्सुक आहेत परंतु सभागृह नसल्यामुळे कला सादरीकरण होऊ शकत नाही.

- **सौ. अपर्णाताई शेटे**
अध्यक्ष तुळजापूर संस्कार भारती.

### ग्रामीण कलावंतास सहज व्यासपीठ मिळेल...



तुळजापूरमध्ये नाट्यगृह उभारले गेल्यास स्थानिक आणि ग्रामीण भागातील कलावंतांना मोठ्या प्रमाणावर फायदा होऊ शकतो. ग्रामीण कलावंतांसाठी संधी मिळेल, गावाकडील नाटक, कीर्तन, लोककला, भारूड आदी कला शहरात सादर करण्याची संधी सहज मिळेल. स्पर्धा व महोत्सवांची संधी नाट्यस्पर्धा, लोककला महोत्सव आयोजित केल्यास नवोदित कलाकारांना मोठे नाव मिळू शकते. तुळजापूर शहराचे सांस्कृतिक वातावरण वाढेल व पर्यटनालाही चालना मिळेल. स्थानिक अर्थव्यवस्थेला (हॉटेल, लॉज, दुकाने) फायदा होईल. शैक्षणिक संस्थांनाही सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी उत्तम सुविधा उपलब्ध होतील.

- **गणेश पुजारी**, अध्यक्ष पुजारी नगर फाऊंडेशन तुळजापूर

### आमदार राणादादांच्या माध्यमातून लवकरच मार्ग काढू...



तुळजापूर शहरातील सांस्कृतीक कार्यक्रमांसाठी अपुऱ्या व्यवस्थाअभावी सुसज्य असे आद्ययावत नाट्यगृह आवश्यकचं असून यापूर्वी अनेकदा यासाठी प्रयत्न ही केले आहेत. उपलब्ध जागा हडकोची असल्यामुळे ती जागा रिझर्व्ह करण्यासाठी प्रयत्न झाले आहेत. आगामी शहर विकास प्रकल्पात आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्याशी सवांद करत नाट्यगृह निश्चित केले जाईल. नाट्यगृह झाल्यास शहराच्या वैभवात भरच पडले यांची खात्री आहे.

- **अमर दाजी हंगरगेकर**, माजी नगरसेवक तथा अध्यक्ष मराठवाडा साहित्य परिषद शाखा तुळजापूर

### नाट्यगृह झाल्यास सर्वसामान्य रसिक प्रेक्षकांना आनंद मिळेल...



तुळजापूर शहराचे वातावरण चांगले आहे, मी एक नाट्यप्रेमी नागरिक असून सोलापूर,लातूर या ठिकाणी वेळ मिळेल तेव्हा नाटक पाहायला नक्कीच जातो. शहरातील पंचरंग प्रतिष्ठानने सांस्कृतीक आणि कलाक्षेत्रावर मोठ्या प्रमाणात काम केले आहे, शहरात कलाकार ही भरपूर आहेत. त्यामुळे अद्ययावत नाट्यगृहाची खरोखरच गरज आहे. आपल्या दैनंदिन व्यस्त वेळापत्रकातून वेळ काढून सहकुटुंब एखादा दर्जेदार कार्यक्रम बघण्यासाठी नागरिक जाऊ शकतात यासाठी तरी नक्कीच एक व्यासपीठ असावे असे वाटते. तुळजापूर शहर शक्तीपीठ नगरी असल्यामुळे नाट्यगृह झाल्यास उत्कृष्ट कार्यक्रमांचे नक्कीच नियोजन होईल आणि त्याचा लाभ ही सर्वसामान्य रसिक प्रेक्षकांना घेता येईल.

- **महेश गवळी**, (आमदार संवाद मंच सदस्य तथा जिल्हाध्यक्ष स्वराज्य संघटना)

### नाट्यगृह हे शहराच्या सांस्कृतिक संपन्न दर्जाचे प्रतीक असते...



शहरात नाट्यगृह असणे सांस्कृतिक समृद्धी, मनोरंजन, सामाजिक संदेश आणि आर्थिक विकासासाठी आवश्यक आहे. नाट्यगृह समाजाला एकत्र आणते आणि कलाकारांना व्यासपीठ देते. नाट्यगृह हे शहराच्या सांस्कृतिक संपन्नतेचे आणि दर्जाचे प्रतीक मानले जाते. लोप पावत चाललेली लोककला, लाकनृत्ये, नाटके, एक अंकी, दोन अंकी, किंवा तीन अंकी नाटका सारखे प्रयोग या माध्यमातून होतात. कलाप्रेमी नागरिकांनी व कलाकारांनी अनेकदा नाट्यगृह व्हावं यासाठी प्रशासनाला निवेदने दिले आहेत. लवकरच शहराला सुसज्ज असे नाट्यगृह मिळावे अशी कलाप्रेमिची मागणी आहे.

- **रतन मस्के**, प्रसिद्ध कोरिओग्राफर तथा अध्यक्ष भवानीशंकर सामाजिक संस्था तुळजापूर.

## संक्षिप्त प्रतिक्रिया...

### तुळजाई नगरीला सांस्कृतिक चळवळीचा वारसा...



तुळजापूर शहरा मध्ये पंचरंग व रंगकर्मी नाट्य संस्थेच्या माध्यमातून खुप मोठी सांस्कृतिक चळवळ गेल्या ४०/४५ वर्षांपासून पासून राबवली जातेय. महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत अनेक वेळा प्रार्थमिक फेरीत पारितोषिक प्राप्त करून अंतिम फेरीत सादरीकरण केले आहेत. आमचे स्पर्धक मकरंद अनासपुरे,अविनाश नारकर,अतुल कुलकर्णी, सई ताम्हनकर अशा दिग्गज कलाकारांना मागे टाकून बक्षीस मिळवली आहेत. यातूनचं मोठ मोठी कलाकार तयार झाले असून आमचे गुरुवर्य श्रीकांत आप्पा नाडापुडे यांनी आमच्या सारखे खुप कलावंत तयार करून तुळजापूर शहराचे वातावरण नाट्यमय केले होते. तुळजापूर शहर विकास आराखड्यासाठी आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांच्या प्रयत्नतून १८६५ कोटी रुपये मिळालेले आहेत, या विकास आराखड्यामध्ये तुळजापूर शहरात एक आधुनिक अशे नाट्यगृह उभे करण्याची मागणी आमच्या सर्व कलाकारांच्या वतीने करण्यात येत आहे लवकरच हे नाट्यगृह करावे अशी आमची विनंती आहे, जेणे करून परत तुळजापूर शहरात सांस्कृतिक चलवळ चालू होईल आणि शहराच्या वैभवात भर पडेल.

- **शिवाजी बोधले**, कलावंत तथा जिल्हा उपाध्यक्ष धाराशिव भाजपा/ जिल्हा संयोजक आत्मनिर्भर भारत.

## संक्षिप्त प्रतिक्रिया...

### स्वप्न पाहण्याचा अधिकार सर्वांनाचं आहे...



लहानपणापासूनच कलाक्षेत्राची आणि चित्रपट सृष्टीत जाण्याचे आवड होती. आज मी मराठी चित्रपट सृष्टीमध्ये विविध प्रोजेक्टवर काम करत आहे, वेब सिरीज करत आहे. माझ्या जन्मगावी तुळजापूर येथे कलेच्या रिलेटेड विविध उपक्रम सातत्याने होत राहिला हवेत, सुविधा उपलब्ध असतील तरच मराठी कलेला प्रेक्षक तयार होतील, स्थानिक कलाकारांना संधी जे तरुण चित्रपट, नाटक किंवा कलाक्षेत्रात काम करायला इच्छुक आहेत, अशांना स्थानिक पातळीवर रिहर्सल, वर्कशॉप, प्रयोग करण्यासाठी जागा मिळते. नाटक बघण्यासाठी सहज सुविधा उपलब्ध झाली पाहिजे यासाठी तुळजापूर शहरात अध्यायवत नाट्यगृह खरोखरच बनणे हे गरजेचे आहे. स्वप्न पाहण्याचा अधिकार सर्वांना आहे त्यामुळे तरुणांना चित्रपटसृष्टीत किंवा नाट्यसृष्टीत येण्यासाठी हक्काचं व्यासपीठ अगोदर उपलब्ध झाले पाहिजे मगच हे शक्य आहे.

- **सीमा कुलकर्णी**, (सिने अभिनेत्री तुळजापूर).

## संक्षिप्त प्रतिक्रिया...

### शहराच्या कलात्मक,बौद्धिक प्रगतीचे केंद्र बनण्यासाठी नाट्यगृह महत्वाचे...



मी गेली २५ वर्ष नाट्य आणि सांस्कृतिक क्षेत्राशी निगडित असून कार्यरत आहे. शहरातील शाळा, महाविद्यालये, नाट्यसंस्था आणि सांस्कृतिक संस्थांच्या सर्वांगीण विकासासाठी नाट्यगृह अत्यंत महत्त्वाचे आहे. नाट्यगृह असल्यास विद्यार्थ्यांना अभिनय, दिग्दर्शन, सादरीकरणासह रंगभूमीवरील प्रत्यक्ष अनुभव सहज उपलब्ध होतो. नाट्यसंस्थांना आपली नाटके, प्रयोग आणि सांस्कृतिक उपक्रम सादर करण्यासाठी सुसज्ज व्यासपीठ मिळते. प्रकाशयोजना, ध्वनीव्यवस्था आणि आसन व्यवस्था यामुळे कार्यक्रमांची गुणवत्ता वाढते. सांस्कृतिक संस्थांना विविध स्पर्धा, कार्यशाळा आणि महोत्सव आयोजित करण्यासाठी योग्य जागा मिळत असल्याने शहरातील सांस्कृतिक वातावरण अधिक समृद्ध होते. नवोदित कलाकारांना स्वतःला सिद्ध करण्याची संधी मिळते आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन मिळते. तुळजापूर शहराच्या कलात्मक, बौद्धिक आणि सांस्कृतिक प्रगतीचे महत्त्वपूर्ण केंद्र बनण्यासाठी नाट्यगृह होणे खूप महत्वाचे आहे.

- **प्रा. डॉ. शिवाजी जेटीथोर**, पंचरंग प्रतिष्ठान सदस्य तथा सांस्कृतिक विभाग प्रमुख यशवंतराव चव्हाण महाविद्यालय.

## संक्षिप्त प्रतिक्रिया...

### लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने विषय तात्काळ मार्गी लावावा



तीर्थक्षेत्र तुळजापूर नगरीमध्ये राज्य नव्हे ते देशभरातील विविध क्षेत्रातील शेकडो कलावंत तसेच चित्रपट सृष्टीमध्ये काम करणारे कलाकार वर्षभरात देवी दर्शनासाठी शहरात येत असतात. प्रत्येक शहराची ज्ञानाची गरज शाळा किंवा शैक्षणिक संस्था पूर्ण करते. आरोग्यासाठी हॉस्पिटल्स असतात. याच सोबत तेवढीच महत्त्वाची आणखीन एक वास्तु तुळजापुरात असणं गरजेचं आहे. ते म्हणजे एक सुसज्ज अद्ययावत असं नाट्यगृह जे सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून समाजाची ज्ञान आणि मानसिक आरोग्यची गरज पूर्ण करेल. यासाठी शहरात नाट्यगृह असायलाचं हवे. लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने हा विषय तात्काळ मार्गी लावावा.

- **शंतनू गंगणे** (प्रसिद्ध सिनेअभिनेता)





बीड : संक्रांतीचा सण महिनाभर असला तरी कुंभारवाड्यात संक्रांतीची तयारी सुरू झाली आहे. संक्रांतीला महिलांना वाणासाठी लागणारे सुगडे तयार करण्यात कलाकार मग्न आहेत.(छाया: कृष्णा शिंदे)

# १८ डिसेंबर पर्यंत सर्व पदवीधरांनी पदवीधर मतदार नोंदणी करून पदवीधर मतदार होण्याचे आवाहन !

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१२ डिसेंबर**

सध्या छत्रपती संभाजीनगर/औरंगाबाद विभागातील बीड,औरंगाबाद,जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर व धाराशिव या ८ जिल्ह्यातील रहिवाशी असलेल्या पदवीधर मतदारांची नाव नोंदणी सुरु असून ज्यांची पदवी १ नोव्हेंबर २०२२ रोजी पूर्ण झाली आहे व ज्यांचे यापूर्वी मतदार म्हणून नाव होते त्या सर्वांनी नव्याने येत्या १८ डिसेंबर २०२५ पर्यंत ऑफलाईन किंवा ऑनलाईन पद्धतीने नाव नोंदणी करून लोकशाहीच्या प्रक्रियेत सहभागी होण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचे तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके यांनी केले आहे.

याबाबत सविस्तर वृत्त कि,येणाऱ्या २०२६ मध्ये मराठवाडा पदवीधर मतदार संघासाठी निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे,त्या अनुषंगाने निवडणूक आयोगाच्या वतीने सध्या पदवीधर मतदारांची नोंदणी सुरु आहे, जो पदवीधर मतदार १ नोव्हेंबर २०२२ रोजी कोणत्याही शाखेतून पदवी उत्तीर्ण असेल किंवा राज्यातील किंवा देशातील कोणत्याही विद्यापीठातून पदवी किंवा ३ वर्षाची पदविका उत्तीर्ण झालेला असेल परंतु तो छत्रपती संभाजी नगर/औरंगाबाद विभागातील ८ जिल्ह्यातील रहिवाशी असेल त्या पदवीधर व्यक्तीस येत्या १८ डिसेंबर २०२५ पर्यंत पदवीधर मतदारांनी स्वतःची नाव नोंदणी करणे आवश्यक आहे, त्यासाठी नमुना नंबर १८ चा फॉर्म भरून त्यावर पासपोर्ट साईज फोटो चिकटवून,पदवी उत्तीर्ण असलेल्या मार्क मेमोची झेरोक्स,आधार कार्डची झेरॉक्स, मतदान कार्डची झेरॉक्स अटेस्टेड करून तहसील कार्यालयात ऑफलाईन पद्धतीने जमा करावा किंवा निवडणूक आयोगाच्या mahaelection.gov.in या website वर जाऊन स्वतःची सविस्तर माहिती भरून,त्यात निवडणूक विभागाच्या तेंशीशिरीलह या साईटवर जाऊन आपला सध्या मतदार म्हणून ज्या विधानसभा मतदारसंघात नोंद आहे तो भाग,केंद्र क्रमांक,मतदान क्रमांक व ईपीक क्रमांक टाकून,ऑनलाईन फॉर्म भरताना विचारलेली संपूर्ण माहिती भरून त्या सोबत पदवी मार्कमेमो व आधारकार्ड झऊक्र मध्ये २०० घइ साईज ,फोटो व स्वाक्षरी गझत्रमध्ये १०० घइ साईज मध्ये अपलोड करून फॉर्म भरून स्वतः मतदार होऊन या प्रक्रियेत सर्व पदवीधर बंधू भगिनींनी सहभागी व्हावे असे आवाहन वैजनाथ सोळंके यांनी केले आहे.

# प्रल्हाद गट अ मधील विद्यार्थ्यांची क्षेत्रभेट

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ डिसेंबर**

दीनदयाल शोध संस्थान संचलित, नानाजी देशमुख विद्या मंदिर गोकुळ शिशू वाटिका चक्रधर नगर बीड, १२ डिसेंबर२०२५ शुक्रवार रोजी प्रल्हाद गटातील विद्यार्थ्यांना व्यवसायातील प्राथमिक गोष्टी माहिती व्हाव्यात त्यांना अभ्यासाबरोबरच आपल्या परिसरातील असणाऱ्या इतर गोष्टींचे ज्ञान अवगत व्हावे यासाठी बार्शी रोड धांडे नगर येथील उषा राऊत यांच्या सावता दाळ मिलला भेट देण्यासाठी नेण्यात आले. डाळ मिल मध्ये गेल्यानंतर विद्यार्थ्यांनी तेथील मशनरी ची माहिती, विविध डाळींची नावे, डाळी कशाप्रकारे केल्या जातात कोणत्या यंत्राद्वारे केल्या जातात अशा प्रकारचे प्रश्न विद्यार्थ्यांनी विचारले. तेथील ताईंनी सर्व माहिती विद्यार्थ्यांना समर्पक रित्या



सांगितली. यंत्राद्वारे काही प्रात्यक्षिक देखील त्यांनी विद्यार्थ्यांना करून दाखवली.

तसेच हे यंत्र चालवण्यासाठी व्यक्तींची आवश्यकता असते व यातून रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात हे देखील विद्यार्थ्यांना त्यांनी सहजरित्या सांगितले. सविता जगदाळे ताई , स्नेहल ताई गोसावी यांचे तसेच सर्व शिक्षक वृंदांचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांना खूप आनंद झाला. विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीचा विकास व्हावा म्हणून नवनवीन प्रकारचे उपक्रम मा.सीमाताई जोशी, ड. अर्चनाताई तुंगार, मा. गंगाधर जी.देशमुख सर, श्रीमती. सुनंदाताई कुलकर्णी प्रयत्नशील असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या क्षेत्रभेटी आनंददायी होतात.

# कै. दत्ताजी भाले प्राथमिक विद्यालयात इयत्ता पहिली ते चौथी च्या वर्गाचा प्रथम सत्र परीक्षा विद्यार्थी उत्तर पत्रिका अवलोकन दिन उत्साहात संपन्न व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ डिसेंबर**

दिनांक १३ डिसेंबर २०२५ वार शनिवार रोजी कै.दत्ताजी भाले प्राथमिक विद्यालयात इयत्ता पहिली ते चौथी या वर्गाचा प्रथम सत्र परीक्षा *विद्यार्थी उत्तरपत्रिका अवलोकन दिन* उत्साहात संपन्न झाला. विद्यार्थ्यांची प्रगती पाहण्यासाठी पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दाखवला. सर्व शिक्षकांनी पालकांशी हितगुज करून, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, भावनिक, मानसिक व शारीरिक अडचणी जाणून घेण्याचा प्रयत्न केला. तसेच त्याची अभ्यासातील प्रगती, अभ्यासातील अडचणी या सुद्धा जाणून घेऊन पालक व शिक्षक या दोघांच्या मदतीने त्या सोडवण्यासाठी प्रयत्न करू असे आश्वासन सर्व शिक्षकांनी पालकांना दिले.

अवलोकन दिनासाठी इयत्ता पहिली ते चौथी मधील एकूण *१२०* पालक आवर्जून उपस्थित राहिले. पालकांनी वर्ग शिक्षकांशी संपर्क साधून विद्यार्थ्यांच्या प्रगती संदर्भात तसेच त्यांच्या अडचणी संदर्भात चर्चा केली. विद्यार्थ्यांच्या प्रगती संदर्भात ,शाळेबद्दल पालकांचे मत, विद्यार्थ्यांमधील पालकांना अपेक्षित वर्तन बदल या सर्व गोष्टी अभिप्रायच्या स्वरूपात पालकांकडून घेण्यात आल्या. हा उपक्रम खरोखरच खूप स्तुत्य आहे असे पालकांनी मत व्यक्त केले.अशा पद्धतीने अतिशय आनंदी वातावरणात विद्यार्थी उत्तर पत्रिका अवलोकन दिन संपन्न झाला.





# विद्यार्थ्यांनी आयबीएम प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा-प्राचार्य जी.के.सानप

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१२ डिसेंबर**

सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भविष्यातील संधीचा विचार करून आयबीएम प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा असे आवाहन प्राचार्य जी. के. सानप यांनी केले.

सुंदरराव सोळंके महाविद्यालयात आयोजित आयबीएम स्कील बील्ड प्रोग्राममध्ये ते बोलत होते. या कार्यक्रमास प्रा. विकास सोळंके, पत्रकार कमलेश जाब्रस, प्रा. किरण गलबे, प्रा. सौरवकुमार सुमन, प्रा. जावेद चाउस, प्रा. देशमुख, प्रा. स्वामी, श्रीमती पायल, कल्पना राउत, सुमेरा शेख यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना प्राचार्य सानप म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरता सोळंके महाविद्यालय सातत्याने प्रयत्नशील आहे. आयबीएम प्रशिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना तज्ञ प्रशिक्षकाकडून मार्गदर्शन करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेऊन आगामी काळात नोकरीच्या संधीसाठी प्रयत्न करावे असे आवाहन करण्यात आले.

# माजलगाव भाजपाच्या वतीने सामाजिक उपक्रमांनी लोकनेते गोपीनाथ मुंडे यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१२ डिसेंबर**

भारतीय जनता पार्टी माजलगावच्या वतीने दिनांक १२ डिसेंबर शुक्रवार रोजी सकाळी दहा वाजता लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंतीनिमित्त पालावर राहणाऱ्या ५१ कुटुंबांना ब्लँकेट वाटप करून देवखेडा येथील गोशाळेला चाऱ्यासाठी आर्थिक देणगी देऊन गोपीनाथराव मुंडे यांची जयंती साजरी करण्यात आली. लोकनेते गोपीनाथ मुंडे यांनी आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत सर्वसामान्य गरजू गरीब वंचित कुटुंबांना न्याय देण्याचा प्रयत्न करत त्यांची अविरत सेवा करण्यासाठी प्रयत्न केला आणि त्यामुळे त्यांच्या विचारावर चालत त्यांचे विचार लक्षात घेऊन माजलगाव भाजपाच्या वतीने त्यांची जयंती सामाजिक उपक्रमांनी साजरी व्हायला हवी



या अनुषंगाने सध्या कडाक्याची थंडी चालू असल्यामुळे पालावरील गरजू गरीब ५१.कुटुंबांना ब्लँकेट वाटप केले व देवखेडा येथील गोशाळेला चाऱ्यासाठी आर्थिक देणगी देऊन गोपीनाथ मुंडे यांची जयंती साजरा करण्यात आली आणि येणाऱ्या काळात देखील माजलगाव भाजपाच्यावतीने सर्वसामान्य गरजू गरीब व्यक्तींसाठी निश्चितच न्याय देण्याचा प्रयत्न करत त्यांची सेवा करण्याचा प्रयत्न करू असा संकल्प या ठिकाणी सर्वांनी केला. या कार्यक्रमाच्या प्रसंगी भाजपाचे ज्येष्ठ नेते डॉक्टर प्रकाश आनंदगावकर राज्य परिषद सदस्य अरुण राऊत ज्ञानेश्वर मेंडके मा नगराध्यक्ष डॉ अशोक तिडके माजलगाव शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी कीट्टी आडगाव मंडळ अध्यक्षा रूपाली कचरे पाथरूड मंडळ अध्यक्ष डॉ अभिजीत सोळंके. सत्यनारायण उनवणे ईश्वर खुरपे शरद कचरे कैलास खुरपे अनंत जगताप बाळासाहेब क्षीरसागर सतीश जोशी आनंद कुलकर्णी विनोद लड्डा संतोष जाधव रामेश्वर चव्हाण धीरज अलझेंडे , बाबासाहेब जाधव संतोष सोळंके नामदेव मुळे नारायण मेंडके रवी गायकवाड यांच्यासह सर्व भाजपाचे नेतेगण पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# विद्यापीठ अंकेक्षणात सावरकर महाविद्यालयाला ए प्लस ग्रेड

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ डिसेंबर**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने केलेल्या शैक्षणिक आणि प्रशासकीय अंकेक्षणात भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या स्वा. सावरकर महाविद्यालयाला ए प्लस ग्रेड मिळाला असून महाविद्यालयाचे प्राचार्य आणि आणि टीमचे संस्थेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने कार्यक्षेत्रातील सर्व महाविद्यालयांचे प्रशासकीय आणि शैक्षणिक अंकेक्षण करण्यात आले असून त्याचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. या मध्ये सावरकर महाविद्यालयाला ए प्लस ग्रेड मिळाल्याबद्दल कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी व्यासपीठावर संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे, सावरकर संकुलाचे अध्यक्ष डॉ.पि.के.कुलकर्णी, माध्यमिक विभागाचे अध्यक्ष प्रमोद कुलकर्णी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, कॉर्डिनेटर डॉ कृष्णा बारटक्के, उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य डॉ उत्तम साळवे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य तथा अंकेक्षण प्रमुख डॉ. उत्तम साळवे यांनी केले. या प्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. सुहास मोराळे म्हणाले की एकता, अनुशासन आणि विकास या त्री सूत्रीवर आपले काम चालू असून सर्व टीमचे हे यश आहे. प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे म्हणाले की सर्वांनी मेहनत घेतल्यामुळे महाविद्यालयाला हे यश मिळाले असून यापुढे आणखी चांगला ग्रेड मिळण्यासाठी संस्था महाविद्यालयाला सर्वतोपरी मदत करील. डॉ. पी. के. कुलकर्णी म्हणाले की सामुदायिक प्रयत्नांमुळे चांगली कामे मार्गी लागतात. प्रमोद कुलकर्णी म्हणाले की प्रत्येकाने आपली जबाबदारी योग्य रीतीने पार पाडल्यामुळे यश मिळाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कृष्णा बारटक्के यांनी केले तर आभार डॉ. सुभाष पटेकर यांनी मानले. संस्था पदाधिकारी यांच्या हस्ते महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक,कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# छत्रपती शिवाजी महाराजांचे तोफखाना विजय अभियान स्वराज्याच्या संरक्षणाची आणि आधुनिक युद्धदृष्टीची क्रांती

वो जो तलवार के साथ अक़्ल भी रखता था ,
वही हर जंग में तारीख़ बदलता था .

इतिहासात काही योद्धे तलवारीने ओळखले जातात , काही सैन्यसंख्येने , तर काही रणांगणावरच्या धैर्याने . परंतु छत्रपती शिवाजी महाराज हे असे राष्ट्रनिर्माते होते , ज्यांनी युद्धाला बुद्धी , विज्ञान आणि दूरदृष्टीची जोड दिली . स्वराज्य उभारताना त्यांनी केवळ मावळ्यांच्या पराक्रमावर विसंबून न राहता आधुनिक लष्करी तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर केला . या दूरदृष्टीचा सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे तोफखाना विजय अभियान . हा अभियान एखाद्या एका लढाईपुरता मर्यादित नसून स्वराज्याच्या संरक्षणासाठी उभारलेली दीर्घकालीन , सुसूत्र आणि प्रभावी युद्धनीती होती.

तोफेच्या नळीतून निघाली गर्जना,
ती केवळ आग नव्हे – ती होती स्वराज्याची घोषणा .
डोंगर हलले , आभाळ दुमदुमले ,
पण मावळ्यांच्या मनात भीती नाही उरली .

त्या काळात भारतातील युद्धपद्धतीत तोफखान्याचे महत्त्व झपाट्याने वाढत होते . मुघल , आदिलशाही , कुतुबशाही आणि पोर्तुगीज सत्तांकडे मोठ्या प्रमाणावर तोफा , बारुद आणि प्रशिक्षित तोफधारी होते . डोंगरी किल्ले असले तरी शत्रूच्या तोफखान्यापुढे ते टिकणार नाहीत , अशी सर्वसाधारण धारणा होती . मात्र छत्रपती शिवाजी महाराजांनी हीच धारणा मोडून काढली . त्यांनी तोफखान्याला केवळ आक्रमणाचे शस्त्र न ठेवता संरक्षण , प्रतिबंध आणि मनोवैज्ञानिक दहशतीचे प्रभावी साधन बनवले .

तोफखान्याचे महत्त्व ओळखणारा दूरदृष्टीचा राजा : लहान वयातच शिवाजी महाराजांनी निजामशाही , आदिलशाही आणि मुघल सैन्याच्या हालचाली जवळून पाहिल्या होत्या . भविष्यातील युद्धे केवळ तलवार आणि भाल्यांवर चालणार नाहीत , हे त्यांनी अचूक ओळखले होते . म्हणूनच स्वराज्य उभारणीच्या सुरुवातीपासूनच तोफखान्याच्या विकासाकडे त्यांनी विशेष लक्ष दिले . किल्ले जिंकताना शत्रूच्या तोफा ताब्यात घेणे , त्यांची दुरुस्ती करणे , आणि स्थानिक कारागिरांकडून नव्या तोफा तयार करून घेणे – ही प्रक्रिया त्यांनी योजनाबद्ध पद्धतीने राबवली .

राजगड , तोरणा , पुरंदर , सिंहगड , पन्हाळा , विशाळगड , प्रतापगड यांसारख्या किल्ल्यांवर मजबूत तोफखाना उभारण्यात आला . किल्ल्यांच्या बुरुजांवर तोफा अशा प्रकारे बसवण्यात आल्या की शत्रूला चढाई करताना अनेक स्तरांवरून मारा सहन करावा लागे . सह्याद्रीचा डोंगर उतार , अरुंद वाटा आणि नैसर्गिक भूप्रदेश यांचा वापर करून तोफांचा प्रभाव अधिक तीव्र करण्यात आला . तोफखाना विजय अभियान म्हणजे केवळ तोफा जिंकणे नव्हे , तर शत्रूची संपूर्ण युद्धक्षमता खिळखिळी करणे होय . शिवाजी महाराजांनी अनेक वेळा शत्रूच्या किल्ल्यांवरील तोफा जिंकून त्या स्वराज्याच्या किल्ल्यांवर बसवल्या . त्यामुळे शत्रूला दुहेरी फटका बसत असे – एकीकडे त्यांची ताकद कमी होत असे आणि दुसरीकडे स्वराज्याची संरक्षणव्यवस्था अधिक मजबूत होत असे .

पुरंदरच्या मोहिमेत , पन्हाळ्याच्या संघर्षात , तसेच कोकणातील किल्ल्यांच्या संरक्षणात तोफखान्याचा अत्यंत प्रभावी वापर झाला . कधी थेट मारा , कधी दबाव , तर कधी केवळ तोफांची उपस्थिती दाखवून शत्रूला माघार घ्यायला भाग पाडले गेले . हे युद्ध केवळ रणांगणावर नव्हते , तर शत्रूच्या मनावर चाललेले होते .

डोंगर बोलले तोफांच्या गर्जनेतून,
स्वराज्य जागे झाले मावळ्यांच्या रक्तातून,
तलवार होती हातात , पण बुद्धी होती डोळ्यांत,
म्हणूनच इतिहास झुकला शिवरायांच्या पावलांत.

आरमारी तोफखाना आणि समुद्रावरील नियंत्रण : छत्रपती शिवाजी महाराजांचे तोफखाना अभियान डोंगरी किल्ल्यांपुरते मर्यादित नव्हते . त्यांनी समुद्रकिनाऱ्यावरही तोफखान्याचे महत्त्व ओळखले . सिंधुदुर्ग , विजयदुर्ग , कुलाबा , सुवर्णदुर्ग यांसारख्या किल्ल्यांवर शक्तिशाली तोफा बसवण्यात आल्या . या तोफांमुळे पोर्तुगीज , इंग्रज आणि सिद्दी यांच्यासारख्या समुद्री सत्तांना थेट आव्हान देण्यात आले .

विजयदुर्ग हा त्या काळातील सर्वात आधुनिक आरमारी किल्ला मानला जातो . येथील तोफखान्यामुळे शत्रूची जहाजे किनाऱ्याजवळ येण्याचे धाडस करत नसत . हा तोफखाना म्हणजे स्वराज्याच्या सागरी सीमांचे अभेद्य कवच होते .स्वराज्याच्या संरक्षणातील तोफखान्याची भूमिका : तोफखान्यामुळे स्वराज्याच्या किल्ल्यांवर दीर्घकाळ वेढा घालणे शत्रूसाठी अत्यंत कठीण झाले . पाणी व्यवस्था , अन्नसाठा आणि तोफांचा अचूक समन्वय यामुळे किल्ले महिनोन्महिने टिकत . परिणामी शत्रू थकून माघार घेत असे किंवा तहासाठी भाग पाडला जाई.शिवाजी महाराजांनी कधीही अंधाधुंद तोफगोळेबार केला नाही . त्यांचा मारा नेहमी मोजका , नेमका आणि उद्दिष्टपूर्ण असे . हीच त्यांची लष्करी शिस्त आणि आधुनिक युद्धदृष्टी होती .आजच्या पिढीसाठी संदेश : छत्रपती शिवाजी महाराजांचे तोफखाना विजय अभियान आपल्याला महत्त्वाचा धडा देते – परंपरेला आधुनिकतेची जोड दिली , तरच राष्ट्र टिकते . संरक्षण , तंत्रज्ञान , प्रशिक्षण आणि नियोजन या सर्व घटकांना समान महत्त्व देणे आवश्यक आहे.छत्रपती शिवाजी महाराजांचे तोफखाना विजय अभियान म्हणजे स्वराज्याच्या इतिहासातील सुवर्णअध्याय आहे . तलवारीइतकाच निर्णायक ठरलेला हा तोफखाना , स्वराज्याच्या आत्मविश्वासाचा आवाज बनला . आजही सह्याद्रीच्या किल्ल्यांवर उभ्या असलेल्या त्या तोफा आपल्याला सांगतात – स्वराज्य केवळ जिंकले गेले नाही , तर बुद्धीने , नियोजनाने आणि आधुनिक विचारांनी घडवले गेले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# माझ्या उसाला लागला वसुलीचा कोल्हा

**त.भा. वृत्तसेवा/सुधीर गंगणे**

**औसा, १३ डिसेंबर :** गेल्या सहा वर्षापासून नैसर्गिक आपत्तीत सापडून बँकाच्या कर्जाची परतफेड झाली नसलेल्या शेतकऱ्यांना थकीत कर्जाची कर्जमाफी करण्याच्या अजेंड्यावर एक वर्षापुर्वी विधानसभेची निवडणुक भाजपाने लढवून निर्विवादपणे जिंकून सत्ता स्थापन केली. त्याचबरोबर सुरु असलेल्या हिव-ाळी अधिवेशनात ३०जुन २०२६ पर्यत कर्जमाफी देण्याचे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले आहे.अतिवृष्टी व रब्बी पेरणीच्या अनुदानावर आणि ऊसाच्या येणाऱ्या बिलावर वर्षाचा ताळमेळ घालत दिवस मोजायची वेळ आज शेतर्कयांवर आली आहे. मात्र ऊस बील आलेल्या शेतर्कयांच्या मागे सहकारी बँकांचा तगादा सुरु झाल्याने शेतकऱ्यांना माझ्या ऊसाला लागला वसुलीचा कोल्हा म्हणण्याची वेळ आली आहे.

यंदा मे महिन्यात पावसाने सुरुवात करुन चांगला पावसाळा होणार असल्याचे संकेत दिले.यामुळे शेतर्कयांची अवस्था या दशकात पहिल्यांदाच कुठे पेरु आणि किती पेरु अशी होती. जुन महिन्यातील उघाडीपीत पेरणी उरकली तसा पाऊस सुरु झाला. तो आक्टोबर महिन्यापर्यंत पाऊस पडला. त्यामध्ये ऑग़स्ट आणि सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीने हातातोंडाशी आलेल्या पिकांचा सुफाडा साफ करीत शेतर्कयांना सपशेल लोळवले. निशब्द व हताश झालेल्या शेतकऱ्यांना मुला मुलींचे शिक्षण, विवाह सोहळे कसे करावेत. खरिप हंगामातील पिकांच्या वायद्यावर घेतलेले खाजगी कर्ज, पेरणीसाठी घेतलेले बि बियाण,रासायनिक खत, फवारणीच्या औषधांचे बीले कशी द्यावीत. व जमिनीची दुरुस्ती करुन रब्बी हंगामाची पेरणी कशी करावी. असा मोठा प्रश्र्न शेतर्कयांना हिमालया पेक्षाही मोठा दिसत होता.

अत्यंत दयनीय अवस्थेत खरिपाच्या चिखलात अडकलेल्या शेतर्कयांना बाहेर काढण्यासाठी शासनाने हेक्टरी ८ हजार ५०० व रब्बी हंगामाच्या पेरणीसाठी १० हजार रुपयांची तीन हेक्टराची मर्यादा ठेवून मदत केली.या मदतीच्या व पुन्हा एकदा उसनवारी करीत पेरणी उरकली. त्यामुळे शिवार हरभरा, गहू, ज्वारी, करडई पिकांच्या हिरवळीने भरुन आला आहे.

मोठ्या अपेक्षेतून आशेचे ओझे लादलेला व वर्षभर पोसलेल्या ऊसाची तोडणी सध्या सुरु आहे. यंदाच्या पावसाळ्यामुळे ऊसाचे उत्पादन अर्ध्याहून अधिक घसरले असले तरी तोडणीनंतर येर्णाय़ा बीलाच्या रकमेची बेरीज, वजाबाकी आणि येर्णाय़ा वर्षाचे गणित शेतकऱ्यांच्या डोक्यात सुरु आहे. येणाऱ्या तुटपुंज्या रकमेत लागणाऱ्या लाखांचा हिशोब आजघडीला शेतकऱ्यांना जुळवणे अशक्य दिसत आहे.

एकीकडे शेतर्कयांच्या डोक्यात आकडेवारीचे काहोळ सुरु असतानाच सहकारी सोसायटी, सहकारी, राष्टीयकृत बँकाचे सेक्रेटरी, शाखाधिकारी, वसुली अधिकारी यांनी थकित कर्जाचे पुर्नगठन किंवा व्याज भरुन चालूबाकी करण्याचा तगादा लावला असल्याचे गावागावात दिसून येत आहे.तर दुसरीकडे गेल्या पाच सहा वर्षापासून अतिवृष्टीने नुकसानीत सापडून आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना राज्य सरकार सरसकट कर्जमाफी करुन दिलेल्या आश्वासनाची पुर्तता करुन दिलासा कधी देणार? की देणार नाही? हा आज तरी अणुत्तरणीय प्रश्न आहे. मात्र औसा तालुक्यातील गावागावातून माझ्या ऊसाला लागला वसुलीचा कोल्हा ची चर्चा आर्थिक, सामाजिक, नैसर्गिक व राजकीय ढंगातून रंगत असल्याने याचे परिणाम आगामी काळात दिसून येणार असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

**तगादा लावणाऱ्या अधिकाऱ्यांच्या तोंडाला काळे फासणार : नागराळे**

विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे सेक्रेटरी, राष्ट्रीयकृत बँकांचे शाखाधिकारी,वसुली अधिकारी यांनी शासन निर्णयानुसार शेतकऱ्यांना कर्ज वसुली अथवा कर्जाचे पुनर्गठण, चालू बाकी करण्यासाठी तगादा लावू नये. अनेक गा-वात सेक्रेटरी, बँकेचे अधिकारी शेतकऱ्यांना थोडेफार उसाचे बिलं आलेली दिसू लागल्यानंतर त्यांच्या मागे वसुलीसाठी व चालू बाकी करण्यासाठी तगादा लावत आहेत.असे प्रकार तात्काळ थांबवण्यात यावेत. अतिवृष्टी आणि पूर परिस्थितीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांचे काही बरे वाईट झाले तर सर्वस्वी आपण जबाबदार राहाल. तसेच एकाही शेतकऱ्यांनी पीक कर्ज अथवा शेतीशी निगडित कुठलेही कर्ज भरू नये. अथवा चालू बाकी करू नये. तेव्हा वरीलपैकी शासन निर्णयाची दखल घेऊन सहकारी व राष्ट्रीयकृत बँकांनी शेतकऱ्यांमध्ये वसुलीच्या संदर्भात भीतीचे वातावरण पसरवू नये. अन्यथा तगादा लावणाऱ्या अधिकारी व सेक्रेटरीच्या तोंडाला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने काळे फासण्याशिवाय पर्याय राहणार नाही असा इशारा मनसेचे जिल्हाध्यक्ष शिवकुमार नागराळे यांनी दिला आहे.



# महाराष्ट्र, शाहू महाविद्यालयात सामंजस्य करार संपन्न

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, १३ डिसेंबर :** निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालय व लातूर येथील राजर्षी शाहू व महाविद्यालयया दोघांमध्ये सामंजस्य करार दिनांक १२ डिसेंबर २०२५ रोजी संपन्न झाला.

यावेळी महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा चे प्राचार्य तथा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड चे विद्या परिषद सदस्य डॉ. कर्मवीर कदम आणि राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य तथा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. महादेव गव्हाणे या दोघांनी सामंजस करारावर सह्या केल्या.

यावेळी राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूरचे उप- प्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, महाराष्ट्र महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ. गोपाळ मोघे यांची उपस्थिती होती. यामध्ये शैक्षणिक संस्थेमध्ये होणाऱ्या विविध विकासाचे आदान प्रदान, अभ्यासोतर व अभ्यास पूरक,क्रीडा प्रशिक्षण शिबिर, संयुक्त अभ्यास मंडळ शैक्षणिक, संशोधनात्मक माहितीचे आदान प्रदान विद्यार्थी व प्राध्यापक यांचे विविध प्रशिक्षण उदबोधन वर्ग मेडिकल कॅम्प, फिटनेस कॅम्प, या सर्व माहितीचे आदान-प्रदान करण्याचे ठरवण्यात आले.

# 'उदयगिरी'च्या खेळाडूंची राज्यस्तरावर सुवर्ण कामगिरी

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, १३ डिसेंबर :** महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाचे खेळाडू





शुभम शिंदे आणि रोहन कोरे यांनी उत्कृष्ट कामगिरीची परंपरा कायम राखत २७ व्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवा-तील खो-खो स्पर्धेत सुवर्णपदकाची घवघवीत कमाई केली आहे.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या खो-खो संघासाठी या दोन्ही खेळाडूंची निवड झाली होती.

दिनांक ४ ते ८ डिसेंबर २०२५ दरम्यान नांदेड विद्यापीठ येथे पार पडलेल्या या स्पर्धेत दोन्ही खेळाडूंनी विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करत प्रभावी व नेत्रदीपक खेळ सादर केला. त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीला क्रीडा संचालक प्रा. सतिश मुंढे आणि प्रा. रमजू शेख यांचे मार्गदर्शन लाभले.

त्याबद्दल महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष बस्वराज पाटील नागराळकर, उपाध्यक्ष ॲड. प्रकाश तोंडारे, बसवराज पाटील मलकापूरकर, सचिव डॉ. रामप्रसाद लखोटिया, सहसचिव मल्लिकार्जुन चिल्लरगे, प्रशांत पेन्सलवार, कोषाध्यक्ष महादेव नौबदे तसेच सर्व संस्था सदस्य, प्राचार्य डॉ. आर. के. मस्के, उपप्राचार्य डॉ. एस. एन. हल्लाळे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# क्राईस्ट इंटरनॅशनल स्कूलमध्ये क्रीडा महोत्सव

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, १३ डिसेंबर :** दि १२ डिसेंबर रोजी क्राईस्ट इंटरनॅशनल स्कूलमध्ये आयोजित वार्षिक क्रीडा स्पर्धा व बक्षीस वितरण सोहळा दिमाखदार वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांच्या ऊर्जा, शिस्त आणि उत्साहाने संपूर्ण विद्यालय परिसर दुमदुमून गेला.

उद्घाटन सोहळ्यास शाळेच्या प्राचार्या जेबाबेरला नादार प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. शाळा समन्वयक संगमेश्र्वर ढगे, भाऊसाहेब यादव, क्रीडा शिक्षक इस्माईल शेख, अकॅडमिक इन्चार्ज अलिसया गोमॅंगो, तसेच सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व अतिथींचे स्वागत शाळा समन्वयक संगमेश्वर ढगे यांनी केले.




# फ्रीज नेणाऱ्या कंटेनरला आग; चालक जखमी

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, १३ डिसेंबर :** शहरातील बिदर रोडवरील रिलायन्स पेट्रोल पंपाजवळ थांबलेल्या एका फ्रीज घेऊन जाणाऱ्या कंटेनरला बुधवारी रात्री ७ वाजताच्या सुमारास आग लागली होती. अग्निशामक दलाने आग विझवल्याने कंटेनर मधील मालाचे नुकसान टळले.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार अहमदाबाद येथून फ्रीज भरून हैदराबादकडे कंटेनर जात होता. बुधवारी रात्री सात वाजताच्या सुमारास बिदर रोडवरील रिलायन्स पेट्रोल पंपाजवळ कंटेनर क्रमांक जी.जे. १८ बी. डब्ल्यू. ६८६८ हा थांबला होता. कंटेनर चालक कंटेनरच्या केबिनमध्ये स्वयंपाक करण्यासाठी तेथे गॅस स्टोह चालू केला होता.

तेव्हा अचानक कंटेनरच्या केबिनमध्ये मोठी आग लागली असे प्रत्यक्षदर्शी नागरिकांनी सांगितले. तर या आगीमध्ये कंटेनर चालक किरकोळ जखमी झाल्याचे पोलिसांनी सांगितले. या आगीच्या घटनेची माहिती नागरिकांनी उदगीरच्या अग्निशमक दलास दिली. काही वेळात अग्निशामक दलाची गाडी तेथे येऊन अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांनी कंटेनरला लागलेली आग विझवली.

कंटेनरच्या समोरच्या भागात मोठी आग लागली होती. परंतु पाठीमागे कंटेनर मध्ये असलेले फ्रीजचे नुकसान टळले. तर आग विझवल्यानंतर कंटेनर मधील फ्रीज बाहेर काढण्यात आले.

## उदगीर येथे आज रोजी चाकूरकर यांना सामूहिक श्रद्धांजलीचा कार्यक्रम

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, १३ डिसेंबर :** दे-शाचे माजी मंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचे निधन झाल्यामुळे त्यांना आम्ही उदगीरकरांच्या वतीने सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्याचा कार्यक्रम १४ रोजी रविवारी उदगीर येथे होणार आहे.

उदगीर येथील श्री. हावगीस्वामी महाविद्यालयाच्या प्रांगणात १४ रोजी दुप-ारी ३-३०वा. हा सामूहिक श्रद्धांजलीचा कार्यक्रम होणार आहे. उदगीर व तालुक्यातील नागरिकांनी या श्रद्धांजलीच्या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन आम्ही उदगीरकरांनी केले आहे.

# हत्तीबेटावर 'श्रीराम प्रतिष्ठान'तर्फे श्रमदान

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, १३ डिसेंबर :** देवर्जन परिसरातील प्रसिद्ध पर्यटन स्थळ हत्तीबेट येथे दत्त जयंतीनिमित्त



दरवर्षीप्रमाणे यंदाही मोठी यात्रा पार पडली. यात्रेदरम्यान हजारो भाविकांनी परिसरात येऊन दर्शन व धार्मिक कार्यक्रमांचा मनसोक्त आनंद घेतला. संपूर्ण यात्रा अत्यंत उत्साहात आणि भक्तीभावाने संपन्न झाली.

यात्रेनंतर परिसरात प्रचंड कचरा साचला होता. ही बाब लक्षात घेऊन देवर्जनच्या श्रीराम प्रतिष्ठान मार्फत विशेष श्रमदान मोहीम राबवण्यात आली. परिसरातील प्लास्टिक, कागद, पर्णकुटीतील कचरा आदी सर्व गोष्टी गोळा करून हत्तीबेट परिसर पुन्हा स्वच्छ आणि सुंदर करण्यात आला.

या श्रमदानाची खास बाब म्हणजे, तीन वर्षांचा चिमुकला मानस बुरांडे सुद्धा हातमोजे घालून मोठ्यांबरोबर स्वच्छतेत मनापासून सहभागी झाला. या मोहिमेत नागराज बुरांडे, नामदेव चित्ते, नितीन नांदुरे, आनंद कुसळकर, विशाल वाडीकर, ऋषी श्रीवास्तव, अनिल दंडे, गोपाळ दंडे यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

स्वच्छता मोहिमेद्वारे नागरिकांना आपले हत्तीबेट सुंदर आणि स्वच्छ हत्तीबेट असा संदेश देण्यात आला.

# विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी बीआयएसचा उपक्रम

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, १३ डिसेंबर :** यशवंत विद्यालयात भारतीय मानक ब्युरो आयोजित 'लर्निंग सायन्स वाया स्टँडर्ड्स'या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन उत्सा-हात पार पडले. विज्ञान शिक्षण अधिक समजून, अनुभवून आणि मानकांच्या आधारे शिकविण्याचा नवीन दृष्टीकोन विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

कार्यशाळेमध्ये बीआयएस भारतीय मानक ब्यूरोचे समन्वयक डॉ. काशिनाथ मुंडे यांनी विविध वैज्ञानिक मानके, दैनंदिन जीवनातील विज्ञानाचा उपयोग, गुणवत्तेचे निकष, सुरक्षितता मानके आणि प्रयोगाधिष्ठित शिक्षण या विषयांवर मार्गदर्शन केले. प्रत्यक्ष प्रयोग, मॉडेल्स आणि मानकांद्वारे विज्ञान व स्टँडर्ड कसे शिकता येते याचा अनोखा अनुभव विद्यार्थ्यांना दिला.

या विशेष उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाची जडणघडण निरीक्षण, विश्लेषण आणि निष्कर्ष काढण्याची क्षमता, गुणवत्तापूर्ण उत्पादनांची निवड करण्याबाबत जागरूकता, मानके आणि विज्ञान यातील परस्परसंबंध यांची समज विद्यार्थ्यांमध्ये या कार्यशाळेतून रुजविण्यात आले.

यशवंत विद्यालयाने आयोजित केलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असून भविष्यातील वैज्ञानिक तसेच जबाबदार ग्राहक तयार करण्याच्या दिशेने एक महत्त्व-ाचे पाऊल म्हणून नोंदवला जाईल असे मत मुख्याध्यापक गजानन शिंदे यांनी व्यक्त केले.

बी आय एस क्लबचे विद्यालयातील समन्वयक महादेव खळुरे यांनी सद-रील कार्यशाळेचे उत्तम नियोजन करून विद्यार्थ्यांना स्टँडर्ड बाबती सखोल ज्ञान मिळवून दिले.

सदरील कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी मानक संवर्धन अधिकारी हर्षमोहन शुक्ला, विद्यालयातील बीआय एस क्लब समन्वयक महादेव खळुरे, विज्ञान शिक्षक सुनिल धन-ुरे, गहनिनाथ क्षीरसागर, प्रतिभा सोलपुरे, विश्र्वरुप धाराशिवे यांनी परिश्रम घेतले.

वरील कार्यशाळेबद्दल माध्यमिक शिक्षणाधिकारी दत्तात्रय मठपती, प्राथमिक शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, अहमदपूरचे गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे, टागोर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.अश-ोक सांगवीकर, संस्थेचे सचिव डी.बी. लोहारे गुरुजी, उपाध्यक्ष डॉ. भालचंद्र पैके, सहसचिव डॉ. सुनिता चवळे, प्राचार्य गजानन शिंदे, उपमुख्याध्यापक माधव वाघमारे,पर्यवेक्षक रामलिंग तत्तापुरे, शिवाजी सुर्यवंशी आदींनी अभिनंदन व कौतुक केले.

# मंगेशकर महाविद्यालयात शिवराज पाटील चाकूरकरांना श्रद्धांजली

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, १३ डिसेंबर :** तालुक्यातील औराद शहाजानी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयात भारताचे माजी केंद्रीय गृहमंत्री, कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा लातूर जिल्ह्याचे सुपुत्र शिवराज पाटील चाकूरकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. शंकर कल्याणे यांनी शिवराज पाटील चाकूरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी राज्यशास्त्र विभागातील डॉ.प्रदीप पाटील यांनी शिवराज पाटील चाकूरकर यांचा समग्र जीवनप्रवास विशद केला.

राजकीय क्षेत्रातील विविध मोठ्या पदांवरून दीर्घकाळ कार्यरत व ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व असलेल्या शिवराज पाटील चाकूरकर यांनी आपल्या कर्तृत्ववान, प्रतिभासंपन्न व सुसंस्कृत आचरणा-तून देशाच्या सर्वांगीण विकासात मौलिक योगदान दिले आहे. लातूर नगर परिषदेचे नगराध्यक्ष, लातूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार, महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष, सलग सात वेळेस लातूर लोकसभा मतदारसंघाचे खासदार, लोकसभेचे सभापती, केंद्र सरकारमध्ये गृहमंत्री पदासह विविध खात्यांचे मंत्री, राज्यसभेचे खासदार व पंजाबचे राज्यपाल इत्यादी विविध संविधानिक पदांवरून शिवराज पाटील चाकूरकर यांनी वे-ळोवेळी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेत त्यांची यशस्वी अंमलबजावणी केली.



संसदेच्या कामकाजाचे थेट प्रक्षेपण, तेथील ग्रंथालयाचे आधुनिकीकरण, उत्कृष्ट संसदपटू पुरस्काराची सुरूवात आदी उल्लेखनीय कार्य त्यांनी लोकसभेचे सभापती असताना केले आहे. ला-तूर येथे रेल्वे व बीएसएफ प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात त्यांची महत्वाची भूमिका राहिली आहे. तसेच शारदोपासक शिक्षण संस्थेच्या वाटचालीत व विकासातही त्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे असे डॉ.प्रदीप पाटील यांनी सांगितले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येत उपस्थित होते.

शारदोपासक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बस्वराज वलांडे, सचिव रमेश बगदुरे, उपाध्यक्ष राजेश वलांडे, उपसचिव पंकज बियाणी, संचालक शिवाजीराव जाधव, मडोळय्या मठपती, दगडू गिरबणे, अनिल डोईजोडे व गोपाळ भिंगोले यांनी शोक व्यक्त केला.

> शिवराज पाटील चाकूरकर साहेबांच्या निधनाने शारदोपासक शिक्षण संस्था व मा.दी.मं.परिवार शोकाकुल असून चाकूरकर परिवाराच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. शिवराज पाटील चाकूरकर साहेबांनी संस्थेच्या जडणघडणीत वेळोवेळी केलेली मौलिक मदत व मार्गदर्शन आम्हास नेहमीच अविस्मरणीय राहील.
>
> **- बसवराज वलांडे,**
> अध्यक्ष, शारदोपासक शिक्षण संस्था, औराद शहाजानी.

# उदगीर न. प. च्या तीन जागेसाठी १० जण रिंगणात

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, १३ डिसेंबर :** उदगीर येथील नगर परिषदेच्या तीन जागेसाठी १०जण निवडणूकीच्या रिंगणात आहेत.

प्रभाग क्र.८ अ, १५ब व १६ब ची निवडणूक येत्या २०डिसेंम्बर रोजी होणार आहे. ८अ मधून भाजपा च्या निकिता आंबरखाने, शिवसेना उबाठा मीरा पडिले, शिवसेनेचे च्या ऐश्र्वर्या पाटील, एमआयएमच्या शेख फातेमा यांच्यात लढत होत आहे. १५ ब मधून काँग्रेसच्या कादरी साहेदा व भाजपा च्या भारती भोसले यांच्यात लढत होत आहे. १६ ब मधून शिवसेनेच्या रविप्रभा खादीवाले, काँग्रेसचे चंदन पाटील, भाजपा चे ॲड. दत्ताजी पाटील, बहुजन समाज पार्टीचे सिद्दीकी इसेखार यांच्यात लढत होत आहे. या १०उमेदवारांचे उमेदवारी अर्ज वैद्य ठरले आहेत.

## वैशाली सताळकर यांचे निधन

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, १३ डिसेंबर :** येथील वैशाली विश्र्वास सताळकर (वय ७०)यांचे शुक्रवारी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर उदगीर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. उदगीर येथील नेत्रतज्ञ डॉ. विश्वास सताळकर यांच्या त्या पत्नी होत.

# मुदखेड मध्ये शॉर्ट सर्किटने दोन दुकाने जळून खाक ; १५ लाखांचे नुकसान

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १३ डिसेंबर-**

मुदखेड शहरात शिवाजीनगर मध्ये नव्याने उभारण्यात आलेल्या अनुसया मार्केटच्या फुटवेअर व ड्रायक्लीनर्स दुकानाला दि. १२ डिसेंबर रोजी रात्री बारा एक वाजताच्या दरम्यान शॉर्टसर्किटने लागलेल्या आगीत दोन दुकाने जळून खाक झाली असून पंधरा लाखांचे नुकसान झाले आहे. गजानन सोनटक्के या सुशिक्षित बेरोजगार तरुणाने मेहनत व कष्टातून उभारलेल्या समर्थ फुट वेअर अँड ड्रायक्लिन्स दुकान बेचिराख झाले असून कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचे साधन हिरावल्याने टाहो फोडला असून कुटुंब उघड्यावर आले आहे.



मुदखेड शहरात गजानन गणपतराव सोनटक्के यांचा सुरुवातीस फेरी दुकानच्या माध्यमातून एक एक रुपया जमा करून मेहनत व कष्टातून कमावलेल्या उत्पन्नातून मोठा व्यवसाय करण्याचे धाडस केले होते. अहोरात्र मेहनत करून कमावलेल्या पैशातून शिवाजी नगरातील अनुसया मार्केट येथे या ठिकाणी समर्थ फुटवेअर अँड ड्रायक्लीनर्स चा व्यवसाय सुरू केला होता. यासोबतच चंद्रकांत काशिनाथ बास्टेवाड या सुशिक्षित बेरोजगार तरुणाने कार्तिक ड्रायक्लीनर्स चा व्यवसाय सुरू केला होता. परंतु शॉर्टसर्किटने आग लागल्याने दोघांची दुकाने बघता बघता जळून खाक झाली आहेत. दुकानातून आगीचा धूर निघत असल्याची माहिती बासटेवाड व सोनटक्के यांना देण्यात आली. घटनेची माहिती कळताच कुटुंबाने मित्रासह धाव घेतली. यानंतर नगरपालिकेच्या अग्निशामक वाहनाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. अग्निशामक चालक उशिरा का होईना पोहोचला असला तरी अग्निशामक वाहन चालू झाले नाही. यानंतर घटनास्थळी नागरिकांनी धक्का मारून वाहन चालू करण्याचा प्रयत्न केला . परंतु त्याचा फायदा झाला नाही.

नगरपालिकेच्या टँकरच्या साह्याने शहरातील मुख्य पाणीपुरवठ्याच्या ठिकाणावरून दुकानाला लागलेली आग विझवण्यासाठी पाणी आणण्यात आले. यानंतर आग आटोक्यात आल्याने इतर दुकानांचे नुकसान मात्र टळल्याची समजते. आगीने रुद्र रूप धारण केल्याने गजानन गणपतराव सोनटक्के तसेच चंद्रकांत काशिनाथ बास्टेवाड या दोघांची दुकाने आधीच जळून खाक झाली आहेत. यामध्ये जवळपास पंधरा लाखांचे नुकसान झाले आहे. या आगीत फुटवेअर चे साहित्य, ड्रायक्लिन्सच्या मशीन तसेच ग्राहकांची कपडे जळाल्याने नुकसान झाले आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण पोलीस फौज फाट्यासह हजर झाले. आग विझविण्यासाठी अनिल ठाकूर, शैलेश गुडमलवार, श्रद्धा बारतोंडे यांच्यासह नवी अबादी मित्र मंडळ, शिवाजीनगर मित्र मंडळ, व्यंकू नगर मित्र मंडळ यांनी शरतीचे प्रयत्न केल्याने मार्केटचे मोठे नुकसान टळले आहे.

**क्षणातच होत्याचे नव्हते**

गजानन सोनटक्के यांनी मेहनत व कष्टातून उभारलेला व्यवसाय शॉर्टसर्किटच्या आगीत बेचिराख झाला आहे. उराशी बाळगलेले स्वप्न धुळीस मिळाले असल्याने कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचे साधन हिरावल्याने अश्रू अनावर झाले होते. गेल्या अनेक वर्षांपासून रस्त्यावर ऊन वारा पाऊस याची तमा न बाळगता कमावलेल्या मेहनतीतल्या पैशातून व्यवसाय आगीत क्षणातच होत्याचे नव्हते झाल्याने शहरात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

# गोकुंदा उपजिल्हा रुग्णालयातील गैरसोयींमुळे रुग्ण त्रस्त

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १३ डिसेंबर-**

किनवट तालुक्यासाठी अतिशय महत्त्वाच्या असलेल्या गोकुंदा उपजिल्हा रुग्णालयातील विविध गैरसोयींमुळे रुग्णांचे प्रचंड हाल होत आहेत. सिटीस्कॅन मशीन उपलब्ध असूनही तज्ज्ञ डॉक्टर नसल्याने त्याचा उपयोग होत नाही. तसेच डोळे तपासणी व शस्त्रक्रियेची सुविधा नसल्यामुळे रुग्णांना आदिलाबाद, यवतमाळ व नांदेड येथे पाठविले जात आहे.

गोकुंदा उपजिल्हा रुग्णालयात एकूण १३ वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे मंजूर असून सध्या केवळ १० डॉक्टर कार्यरत आहेत. उर्वरित ३ वैद्यकीय अधिकारी अन्यत्र प्रतिनियुक्तीवर आहेत. याशिवाय ३ कक्षसेवकही प्रतिनियुक्तीवर असल्याने रुग्णसेवेत मोठा अडथळा निर्माण झाला आहे.




आदिवासीबहुल किनवट तालुक्याच्या दुर्गम भागातील गोरगरीब रुग्ण उपचारासाठी या रुग्णालयात येतात. मात्र आवश्यक तज्ज्ञ सेवा उपलब्ध नसल्याने त्यांना लगतच्या जिल्ह्यांतील रुग्णालयात रेफर केले जाते. सिटीस्कॅन मशीन असूनही तज्ज्ञ डॉक्टर नसल्यामुळे रुग्णांना खासगी रुग्णालयांचा आधार घ्यावा लागत असून आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. रुग्णालयात डोळे तपासणी तसेच डोळ्यांच्या शस्त्रक्रियेची सुविधा नसल्यामुळे अनेक वृद्ध रुग्णांना नांदेड, आदिलाबाद व यवतमाळ येथे जावे लागत आहे. तसेच रुग्णालयात रक्तपेढी असली तरी पुरेशा रक्तसाठ्याअभावी अडचणी निर्माण होत आहेत. औषध निर्माण अधिकाऱ्यांची पदे अपुरी भरल्याने औषध वितरणातही समस्या निर्माण झाल्या आहेत. रुग्णालयाच्या व्यवस्थापनावर लक्ष ठेवण्यासाठी सुमारे १५ वर्षांपूर्वी रुग्णकल्याण समितीची स्थापना करण्यात आली होती. मात्र तेव्हापासून तीच समिती कार्यरत असून नव्याने कोणतीही सुधारणा झालेली नाही.

नांदेड मुख्यालयापासून सुमारे १५० किलोमीटर अंतरावर असलेल्या या उपजिल्हा रुग्णालयातील गैरसोयींकडे आरोग्य विभागाने तातडीने लक्ष देऊन पुरेशा वैद्यकीय सुविधा, तज्ज्ञ डॉक्टर व मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे, अशी जोरदार मागणी नागरिक व रुग्णांकडून होत आहे.

## खा. शरद पवार यांचा वाढदिवस साजरा

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. १३ डिसेंबर-**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचेअध्यक्ष खा.शरदचंद्र पवार यांच्या वाढदिवसानिमित्त माहूर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतर्फे विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले.

या कार्यक्रमांतर्गत शहरातील शाळांमधील विद्यार्थ्यांना वही, पेन व खाऊ वाटप करण्यात आले. तसेच गरजू नागरिकांना उबदार ब्लँकेटचे वाटप तर स्थानिक रुग्णालयात दाखल रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले.

या वेळी नगराध्यक्ष फिरोज दोसानी, सभापती दत्तराव मोहिते, तालुका अध्यक्ष मेघराज जाधव, शहराध्यक्ष अमित येवतिकर, नगरसेवक प्रतिनिधी रफिक सौदागर, आकाश कांबळे, इरफान सैय्यद, मनोज कीर्तने,आसिफ पठाण, सुमित खडसे, ताणूभाई, शोहेल शेख आदी उपस्थित होते.



**मुखेड- जागतिक दिव्यांग दिनानिमित्त मुखेड येथे विविध सामाजिक शैक्षणिक व जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आले. या कार्यक्रमातून दिव्यांग विद्यार्थ्यांनी अनेक क्रीडा स्पर्धेत सहभाग नोंदविला. कालिकामाता निवासी मतिमंद विद्यालय येथे डॉ. हेलन केलर दिव्यांग यांचे जनक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विविध क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या.**

## क्षितिज जाधव यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

**नांदेड-** भारतीय जनता पार्टीचे माजी जिल्हा सरचिटणीस क्षितिज जाधव व त्यांचा मुलगा श्रेयांशु याचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्त विविध उपक्रम राबविण्यात आले.सकाळी शहरातील महावीर चौक येथील पंचवटी हनुमान मंदिर परिसरात बेघर, गरजूंना अन्नदान करण्यात आले. त्यानंतर नेरली कुष्ठधाम येथे देखील अन्नदान वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला. या विविध उपक्रमासह सायंकाळी भगीरथ नगरातील तक्षशिला बुद्ध विहार परिसरात अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या अभिष्टचिंतन सोहळ्याला भाजपा माजी महानगराध्यक्ष प्रवीणभाऊ साले, मिलिंद देशमुख,डॉ सचिन उमरेकर विजय गंभीरे,राजू यनम, सूर्यकांत कदम, मनोज जाधव, साईप्रसाद महाजन, उद्धव पावडे, प्रा.कमलाकर कणसे, संतोष कुलकर्णी, सुरेश काशिदे, दिपंकर बावस्कर, गौतम सरपाते, विलास देवळे केशव रोडे उद्धव पावडे सिद्धार्थ कवठेकर मतीन शेख शेख रफिक यांच्यासह अनेकांनी हजेरी लावुन क्षितिज जाधव व त्यांचा मुलगा श्रेयांशु यास शुभेच्छा दिल्या.विविध उपक्रम यशस्वी करण्यासाठी क्षितिज जाधव मित्रपरिवाराचे मुकुंद धानोरकर, नामदेव केंद्रे,संदीप बिलोलीकर, कैलास वडजे, राजीव गायकवाड, बंडू गिरगावकर, कपिल तीमेवार, अमोल बुक्तरे, गणेश शिंदे, आकाश लेवडे,पवन जाधव,उमेश घुगे यांनी परिश्रम घेतले



## स्वारातीम विद्यापीठाच्या २० डिसेंबरच्या परीक्षा पुढे ढकलल्या;

**नांदेड-** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या हिवाळी २०२५ पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सध्या सुरू आहेत. दरम्यान, दि.२० डिसेंबर, २०२५ रोजी होणाऱ्या नगरपरिषद व नगरपंचायतच्या सार्वत्रिक निवडणुकांमुळे त्या दिवशी आयोजित करण्यात आलेल्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. या पुढे ढकललेल्या परीक्षा संबंधितअभ्यासक्रमांच्या शेवटच्या दिवशी घेण्यात येणार असल्याचे विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने स्पष्ट केले आहे. सुधारित वेळापत्रकानुसार, दि. २० डिसेंबर रोजी होणाऱ्या बी.व्होक (पीएसएसडी), बी.व्होक (एमएलटी), एम.लिब (न्यू व रिव्हाइज्ड) या अभ्यासक्रमांच्या परीक्षा आता २२ डिसेंबर, २०२५ रोजी आयोजित करण्यात येणार आहेत. तसेच एल.एल.एम. प्रथम वर्ष व एम.पी.एड. द्वितीय वर्ष या अभ्यासक्रमांच्या परीक्षा २३ डिसेंबर, २०२५ रोजी होतील. बी.व्होक सीएमई, बी. व्होक बी.एफ. एस.आय., बी.एस्सी. जनरल, बी.एड. प्रथम वर्ष, बी.पी.एड. प्रथम वर्ष, एम.एड. एम.लिब व एम.पी.एड. प्रथम वर्ष या अभ्यासक्रमांच्या परीक्षा २४ डिसेंबर २०२५ रोजी पार पडणार आहेत. एम.कॉम (जनरल), एम.कॉम (बँकिंग अँड इन्शुरन्स), एम.जे., एम.ए., एम.एस. डब्ल्यू. व एम.व्होक एफ.टी. या अभ्यासक्रमांच्या परीक्षा २६ डिसेंबर २०२५ रोजी घेण्यात येतील. याचप्रमाणे एम.एस्सी. जनरल (एनईपी), एम.एस्सी. जनरल (सीबीसीएस), एम.एस्सी. एसई (सीबीसीएस) एम.एस्सी. सीएम (सीबीसीएस), एमसीए द्वितीय वर्ष व बी.ए. एल.एल.बी./ एल.एल.बी. द्वितीय वर्ष या अभ्यासक्रमांच्या परीक्षा २७ डिसेंबर २०२५ रोजी होतील. एम.जे. (न्यू) या अभ्यासक्रमाची परीक्षा २९ डिसेंबर, तर एम.जे. (रिव्हाइज्ड) ची परीक्षा ३१ डिसेंबर, २०२५ रोजी पार पडणार आहे. तसेच बीबीए व बीबीए (एबीएम) या अभ्यासक्रमांच्या परीक्षा ३ जानेवारी, २०२६ रोजी आयोजित करण्यात आल्या आहेत. या सुधारित वेळापत्रकाची सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी व महाविद्यालयांनी नोंद घ्यावी. तसेच सविस्तर माहितीसाठी विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे यांनी केले आहे.



# कुशावाडी प्रीमियर लीगचे अर्जुन गायकवाड यांच्या हस्ते उद्घाटन

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. १३ डिसेंबर-**

देगलूर तालुक्यातील कुशावाडी येथे कुशावाडी प्रीमियर लीगच्या (घझङ) पहिल्या वर्षाच्या भव्य क्रिकेट स्पर्धेचा उद्घाटन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या स्पर्धेचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते अर्जुन गायकवाड यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या लीगमध्ये एकूण १६ संघांनी सहभाग नोंदवला असून पहिल्याच दिवशी रंगतदार सामने आणि उत्स्फूर्त प्रतिसादाने स्पर्धेला दणदणीत सुरुवात झाली.



ग्रामीण भागातील युवकांना क्रीडाक्षेत्रात प्रोत्साहन मिळावे, खेळाडूंमधील गुणवत्ता विकसित व्हावी आणि एकोप्याची भावना बळकट व्हावी, या उद्देशाने कुशावाडी प्रीमियर लीग (घझङ) स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेसाठी आकर्षक पारितोषिकांची घोषणा करण्यात आली असून प्रथम पारितोषिक राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) प्रदेशउपाध्यक्ष व्यंकटराव पाटील गोरेगावकर, द्वितीय पारितोषिक सामाजिक कार्यकर्ते अर्जुन गायकवाड यांच्या वतीने देण्यात येणार आहे. तसेच बेस्ट बॉलर, बेस्ट बॅट्समन, मालिकावीर आणि सामनावीर अशी वैयक्तिक पारितोषिकेही विविध मान्यवरांच्या वतीने प्रदान करण्यात येणार आहेत.

उद्घाटन प्रसंगी अर्जुन गायकवाड, सरपंच प्रतिनिधी तानाजी पाटील हिंगोले, माजी सरपंच जयसिंग पाटील कोसंबे, सहशिक्षक लक्ष्मण दौंतुलवाड सेवानिवृत्त शिक्षक फुलसिंग जाधव, यादव कांबळे, ग्रामपंचायत सदस्य बालाजी डुकरे, संगम वाघमारे, नबीसाब शेख, हाणमंत कोसंबे, मारोती कोसंबे यांच्यासह ग्रामस्थ व क्रिकेटप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कुशावाडी प्रीमियर लीगचे यशस्वी आयोजन प्रेमसिंग पवार, श्रीकांत पवार, प्रेमसिंग जाधव, विकास चव्हाण आदींनी केले असून संपूर्ण परिसरात क्रीडामय वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामीण भागातील क्रिकेटपटूंना व्यासपीठ देणारी ही स्पर्धा महत्त्वपुर्ण ठरणार आहे.

# बिलोली येथील श्रीसाई बाबा पालखी दिंडी शिर्डीकडे मार्गस्थ

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. १३ डिसेंबर-**

हजारो साई भक्तांचे श्रध्दास्थान आसलेले बोधन रोड बिलोली येथील श्रीसाई बाबा पालखी पायी दिंडी यात्रा आज शनिवार रोजी टाळ मृदंगाच्या गजरात वाजत गाजत ही दिंडी यात्रा शिर्डीकडे मार्गस्थ झाली आहे.



बिलोली शहरासह तालुक्यातील व शेजारील सिमावर्ती तेलंगना राज्यात अल्पावधी काळातच नवसाला पावणारे हजारो श्रीसाई भक्तांचे श्रध्दास्थान म्हणून परिचित आसलेले विशेष बाब म्हणजे दर गुरुवारी येथे दानशुर साई भक्ताकडुन आरती व महप्रसादाच्या कार्यक्रमात साईभक्ताची दर्शनासाठी मोठी गर्दी होत आसते व भक्त महाप्रसादाचा देखील भक्त लाभ घेत आसतात. भक्तांच्या नवसाला पावन होणारे हे श्रीसाई बाबांचे मंदिर बिलोली शहरा पासुन जवळच आसलेल्या बोधन रोडवर्ती पंधरा वर्षा पुर्वी स्थापन झाले आसुन या मंदीर ट्रस्टची परंपरा कायम ठेवत यंदाही पायी पालखी दिंडीत जवळ पास ७० ते ८० महिला व पुरुष साई भक्त सहभागी झाले आसुन सदरची ही दिंडी बिलोली ते नर्सि मार्गे गडगा, लोहा, परळी वैजनाथ, राजोरी, शिरूर कासार, मोहटा, वळदगाव, शनिशिंगनापुर या मार्गानी ४७५ ते ५०० की. मी. चा प्रवास १८ दिवस पार करून ३१ डिसेंबर रोजी शिर्डीच्या पवित्र पावन भुमित पोहचेल.व नुतन वर्षात श्रीसाईबाबांच्या चरणी नतमस्तक होऊन बिलोलीच्या दिशेनी मार्गस्थ होईल.या पालखीचे आज दि. १३ डिसेंबर शनिवार रोजी टाळ मृदंगाच्या गजरात वाजत गाजत जय.. जय काराच्या घोषणानी निघालेल्या या पायी पालखी दिंडीमध्ये येथील श्री साई मंदिर ट्रस्टचे विश्वस्त किरण देशमुख मंदिर पुजारी शिवकुमार स्वामी शेवाळकर, शंकरराव मावलगे,अँडो. भरत पवार, राजू पाटील शिंपाळकर,राजेंद्र कांबळे, सतिश बळवंतकर,कुणाल देशमुख,शंकर अण्णा रेड्डी, राहुल शिंदे,सतिश पटाईत, सचिन पटाईत,लक्ष्मण गादगे,सुरेश साखरे, राचेवाड,सागर सुरोड,दिपक सगरोळीकर,ईरवंत इळेगावे,झाडे पाटील, यांच्यासह शेकडो महीला षुरूष साईभक्त सहभागी झाले होते.



**नांदेड- राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्यावतीने आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या साई सुभाष, वसंतनगर, नांदेड येथील संपर्क कार्यालयात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी नांदेड शहर जिल्हा कार्यकारणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते माजी खासदार तथा लोहा विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शहर जिल्हाध्यक्ष माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा माजी आमदार मोहनराव हंबर्डे, माजी आमदार अविनाशराव घाटे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष सुरज पाटील होटाळकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शहर कार्याध्यक्ष माधव पावडे, शहर कार्याध्यक्ष सरजितसिंघ गिल यांच्या उपस्थितीत पत्रकार परिषद घेऊन जाहीर करण्यात आली.**

# येवली लघु तलावातून रब्बी हंगामाच्या पहिल्या आवर्तनाला प्रारंभ

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. १३ डिसेंबर-**

लघू पाटबंधारे भोकर अंतर्गत येणारे सिंचन शाखा ०२ हादगाव तालुक्यातील येवली लघु तलावातून सन २०२५-२६ रब्बी हंगामासाठी दिनांक ९ डिसेंबर २०२५ रोजी पहिल्या पाणी आवर्तनाचा शुभारंभ गावातील प्रथम नागरिक तथा सरपंच गजानन कंठाळे व सिंचन शाखा भोकर क्रमांक झिरो दोन चे भोकरचे डी.बी बिराळे यांच्या शुभहस्ते करण्यात आला आहे. यावेळी पोलीस पाटील रमेश धोंडीबा पाटील, प्रगतशील शेतकरी शिवाजी रामपुरे, रमेश वाठोरे, येवली तलावाचे बीट प्रमुख एस.पी शिवेवार आदी मान्यवर उपस्थित होते. या वेळी तलावाचे प्रमुख एस.पी. शिवेवार व्ही.डी. यमगर एस पी.आडे, एन. बी. कांबळे, डी.बी. बेराळे, रमेश वाठोरे यांनी सकाळी अकरा वाजता येवली येथे उपस्थित रहात. सर्व बागायतदार शेतकऱ्यांची बैठक घेतली. बैठकीत रब्बी हंगामातील पाणी पातळी विषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. शासनाच्या नियमावलीची माहिती समजावून सांगताना, थकबाकीदार शेतकऱ्यांनी आपल्या थकीत रकमेची त्वरित भरपाई करून शासनास सहकार्य करावे, जेणेकरून उत्कृष्ट सेवा देणे शक्य होईल असे आवाहन संबधित अधिकाऱ्यांनी केले आहे. पाण्याचा कोणताही अपव्यय होऊ नये, याची प्रत्येक बागायतदारानी दक्षता घ्यावी, अशा सूचना यावेळी देण्यात आल्या. बैठकीनंतर सर्व अधिकारी व बागायतदारांच्या उपस्थित प्रत्यक्ष तलावावर जाऊन रब्बी हंगामासाठी च्या पहिल्या आवर्तनात सुरुवात करण्यात आली. यावेळी बागायतदार शेतकरी शिवाजी रामपुरे, बाबुराव मेकेवार, नितीन जाधव, उत्तम खिल्लारे, पट्टेवार यांच्यासह अनेक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हडको येथे श्री रंगनाथ महाराज चरित्र कथा महोत्सवाचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १३ डिसेंबर-**

वासवी व वासवी वनिता क्लब सिडको नवीन नांदेडच्या वतीने ब्र.भु. वेदांत केशरी हभप श्री रंगनाथ महाराज परभणीकर गुरुजी यांच्या ५६ व्या पुण्यस्मरण नमित्त श्री रंगनाथ महाराज चरित्र कथा महोत्सव २०२५ चे दिनांक १३.१४.१५ व १६ डिसेंबर रोजी श्री भगवान बालाजी मंदिर देवस्थान हडको येथे आयोजित करून यावेळी प्रख्यात व्याख्याते प.पु. श्री हरी हरानंद भारती स्वामीजी व महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार हभप साध्वी सोनालीताई करपे चकलंबा यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे.

हडको येथील श्री भगवान बालाजी मंदिर देवस्थान आनंद सागर सोसायटी हडको येथे वासवी व वासवी वनिता क्लबच्या वतीने ब्र.भु. वेदांत केसरी हभप श्री रंगनाथ महाराज परभणीकर गुरुजी यांच्या ५६ व्या पुण्यस्मरणा निमित्त श्री रंगनाथ महाराज चरित्र कथा महोत्सव २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक १३ डिसेंबर रोजी सकाळी १०२ क्लाशधारी महिलांसह भव्य ग्रंथ व तैलचित्र मिरवणूक सिडकोच्या मुख्य रस्त्याने निघून श्री भगवान बालाजी मंदिर देवस्थान हडको येथे विसर्जित करण्यात आली. या मिरवणूकी दरम्यान आश्वरथातुन प्रख्यात व्याख्याते वासवी पुराणाचे प्रथम सादरकर्ते प.पू. श्री हरीहरानंद भारती स्वामीजी यांची मिरवणूक काढण्यात आली यावेळी सोबत सिडको येथील पिंटू महाराज यांची उपस्थिती होती. यावेळी आयोजकांच्या वतीने नागरिकांची दंत तपासणी ग्रामीण डिटेल कॉलेज पांगरी च्या वतीने करण्यात आली तर फिजिओथेरपी कॉलेज अँड रिसर्च सेंटर यांच्यामार्फत मोफत शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर चार वाजता ब्र.भू. वेदांत केशरी हभप श्री रंगनाथ महाराज परभणीकर यांच्या जीवन चरित्र कथा प्रथम दिवसास प्रारंभ करण्यात आला दिनांक १४ डिसेंबर रोजी द्वितीय जीवन चरित्र कथा दिनांक १५ डिसेंबर रोजी तृतीय जीवन चरित्र कथा व दिनांक १६ रोजी प्रसिद्ध कीर्तनकार सोनालीताई करपे यांचे काल्याचे किर्तन होईल त्यानंतर दुपारी एक ते पाच वाजेपर्यंत महाप्रसाद असेल तेव्हा सिडको हडको परिसरातील भाविक भक्त व समाज बांधवांनी श्री रंगनाथ महाराज चरित्र कथा महोत्सवाचा लाभ घ्यावा असे आव्हान वासवी व वासवी वनिता क्लब सिडको यांनी केले आहे. यावेळी सिडको हडकोतील डॉक्टर, शिक्षक, प्रतिष्ठित व्यापारी व मोठ्या संख्येने समाज बांधवांची उपस्थिती होती.